Digitization by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

श्रीमत

एकनाथ महाराजांचे चरित्र



मे. सरस्वती बुक डिस्ट्रिब्युटर्स, पुणे

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

9-3
Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

जगाच्या कल्याणा संतांच्या विभूती। देह कष्टविती उपकारे ।।
या उक्तीप्रमाणे जीवन सार्थ करणाऱ्या

श्री संत एकनाथ महाराजांचे चरित्र

* संपादक *
अरविंद पाटोळे

किंमत १५ रुपये

मे. शारदा साहित्य, पुणे २.

प्रमुख वितरक

मे. सरस्वती पब्लिकेशन्स्
२८/अ, अंबर चेंबर्स, ४ था मजला, बुधवार पेठ, पुणे २
☎ २४४५१२१९ / २४४६७७९८

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

★ अनुक्रमणिका ★

संत एकनाथपूर्व सामाजिक स्थिती	३
मुंज - बालपण - शिक्षण	१२
गुरूंसाठी मार्गदर्शन	१९
गुरूंचे चरण धरले	२३
गुरूंची सेवा	३२
संतत्वाबरोबर पराक्रमही	३७
तो सेवक इथेच आहे	४०
लाखाची की दीडकीची, चूक ती चूकच !	४३
मन दत्तभक्तीत गुंतव - गुरूंचा आदेश	४७
श्री दत्तात्रेय-दर्शनाचा मार्ग	४८
अजब दर्शन	५२
श्री दत्तात्रेय दर्शन	५४
स्वामी ... छेः, परमेश्वरच !	५७
माझे कीर्तन माणसांसाठी !	५९

प्रकाशक : प्रकाश य. कुंदूर
मे. शारदा साहित्य
६८१ ब, बुधवार पेठ, विनायक टॉवर, पुणे २.
☎ २४४६७७९८/५६२३१४९३

© सर्व हक्क प्रकाशकाधीन

● आवृत्ती : २००४

मुद्रक : आनंद अं. कुंदूर
मे. श्रीराम ऑफसेट
१४/२३ गायत्री बिल्डिंग, धायरी, पुणे ४१. ☎ २४३९२००९

✱ प्रमुख विक्रेते ✱

मे. सरस्वती ग्रंथ भांडार, अप्पा बळवंत चौक, पुणे २. ☎ २४४५११५८

मे. सरस्वती बुक डेपो, १८ नवी पेठ, सोलापूर ७. ☎ २६२६६३०

मे. कुंदूर बंधू पुस्तक भांडार, ६३ नवी पेठ, सोलापूर ७. ☎ २६२६१५६

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

श्री संत एकनाथ महाराजांचे चरित्र

❋ संत एकनाथपूर्व सामाजिक स्थिती ❋

महाराष्ट्रातील हिंदू राजा रामदेवराय याचा पराभव होऊन तेथे मुसलमानी राजांचा अंमल सुरू झाला. सांस्कृतिक दृष्टीने हा काळ ज्ञानेश्वर महाराज, संत नामदेव यांचा होता. त्यानंतर मुस्लिम राजांनी आपले पाय घट्ट रोवले आणि हळुहळू आपल्या क्रौर्याची पकड आवळणे सुरू केले. संत एकनाथांच्या काळापर्यंत ही पकड एकदम घट्ट आणि मजबूत झाली होती. शेतीवाडीत आलेल्या पिकांचे फक्त नेत्रसुखच शेतकऱ्यांना मिळायचे. खपाटीस गेलेले पोट बांधून कष्ट करायचे आणि ऐन तोंडात घास घालण्याच्या वेळी लुबाडणूक, अरेरावीने पळवापळवी यामुळे आवंढा गिळून हताशपणे पहात रहाण्यापलीकडे शेतकरी कांही करू शकत नव्हता. डोळ्यादेखत मुलीबाळी, सुना, पत्नीची अब्रू लुटली जात असल्याचं पाहायचं दुर्दैव त्यांच्या नशिबी आलं होतं.

मुसलमान राजांना राज्यप्रसाराच्या लालसेबरोबरच धर्म-प्रसाराचीसुद्धा जबरदस्त लालसा होती. त्यामुळे महाराष्ट्राचे धार्मिक जनजीवन घायाळ झाले होते. जनतेत या सर्वांविरुद्ध, संघर्ष करण्याचीसुद्धा शक्ती उरली नव्हती. जगण्यापुरती त्यांच्या कुडीत फक्त धुगधुगी तेवढीच शिल्लक राहिली होती.

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

एकनाथांचा काळ म्हणजे इ. स. १५३३ ते १५९९ हा होय. या काळात या मुसलमानी बादशहांचे शासन चांगले स्थिर झाले. आदिलशाही आणि निजामशाही अशी या शासनाची विभागणी झाली होती. आता या दोन शाह्यांच्या कचाट्यात महाराष्ट्र सापडला होता.

संत नामदेवांच्या कालखंडानंतरच्या सुमारे दोनशे वर्षांच्या प्रदीर्घ कालखंडामध्ये राजकीय आणि धार्मिक आक्रमणांना तोडीस तोड प्रत्युत्तर देऊ शकतील, अशा पराक्रमी, शूर, कर्तृत्ववान व्यक्तित्वाचा समाजात पूर्णपणे अभावच दिसून येत होता. सारे क्षात्रतेज लयाला गेल्यासारखे वाटत होते. झालेल्या केविलवाण्या परिस्थितीचे कोणालाच काही वाटेनासे झाले होते.

इ. स. १५६४ मध्ये तालिकोट येथे झालेल्या युद्धात हिंदूंचे मोठे आशास्थान असलेल्या प्रबळ अशा विजयानगरच्या साम्राज्याचा अंत झाला. त्यामुळे हिंदू धर्मीयांच्या सामाजिक जीवनात आणि व्यक्तींच्या हृदयात भयाण काळोख दाटून गेला. काही छोट्या छोट्या क्षेत्रात कांही सरदार संघर्ष करीत होते; तर कांही संत आपल्या वाणीने, उपदेशाने प्रभाव पाडून समाजजीवनात चैतन्य निर्माण करण्याचा प्रयत्न करीत होते.

संत एकनाथांसारखे एक प्रभावी धार्मिक जागृतीचे केंद्र प्राप्त होताच सारे संघर्ष करणारे छोटे छोटे सरदार व मृतप्राय झालेल्या समाजातील माणसे संगठित होऊ लागली. त्यांच्यातील स्वाभिमान जागृत होऊ लागला, जो तो संघर्षासाठी सिद्ध झाला. आपल्या समर्थ पराक्रमाने मुसलमान शासनाच्या छातीत धडकी भरवू लागला. त्यांच्या सिंहासनाला हादरे बसू लागले. पायाखालची वाळू घसरू लागली.

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

मग आपले शासन व्यवस्थित चालविण्यासाठी येथील जनतेचीच मदत घेण्याचा डाव मुसलमान प्रशासनाने आखला. सैन्यात कांही स्थानिक लोकांना नोकरीस ठेवले. बुऱ्हाणपूरच्या निजामाला कुँवरसेन नावाच्या ब्राह्मण व्यक्तीस आपला मुख्य प्रधान म्हणून नेमून घ्यावे लागले. मग इथलीच माणसे शत्रूपक्षांकडून इथल्याच माणसांविरुद्ध लढू लागली.

इथल्या लोकांचे सहकार्य जर मुसलमान शासकांनी घेतले नसते तर संपूर्ण समाजमानसात धगधगणाऱ्या असंतोषाच्या ज्वालामुखीचा भयंकर स्फोट होऊन पराक्रमाच्या लाव्हाने सारे मुसलमान शासन जाळून भस्मसात करून टाकले असते.

संत एकनाथांचे गुरू श्री जनार्दन स्वामी यांनी स्वत:च्या तेजस्वी पराक्रमाने, कर्तृत्वाने मुसलमान शासनाचे प्रमुख केंद्र असणाऱ्या दौलताबाद किल्ल्याच्या प्रमुख किल्लेदाराचे पद प्राप्त केले होते. त्यांचा मुसलमान राजांवर किती प्रभाव होता हे कळण्यासाठी त्या वेळची एक घटनाच आपणांस पुरेशी आहे. श्रीजनार्दन स्वामी दत्तात्रेयांचे कट्टर उपासक होते. त्यांनी दत्त संप्रदायाचीच दीक्षा घेतलेली होती. त्यामुळे त्यांच्या व्यक्तिगत उपासनेचा गुरुवार हा प्रमुख दिवस होता. पण मुस्लिम धर्मीयांचा शुक्रवार हा नमाजाचा दिवस. वर सांगितल्याप्रमाणे दौलताबादेत मुसलमानांचे शासन असूनसुद्धा नमाजाचा दिवस म्हणून शुक्रवारी सुटी न ठेवता गुरुवारी सुटी दिली जात असे.

याच सुमारास बहामनी राज्य, आदिलशाही, निजामशाही, कुतुबशाही आणि बिदरशाही ही मुसलमानी शासनाची पाच प्रमुख अशी सत्ताकेंद्रे आता स्वार्थापायी आपापले श्रेष्ठत्व सिद्ध करण्यासाठी आपापसांतच लढाया करू लागली होती. यासाठी त्यांना हिंदुधर्मीय

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

सरदारांची मदत घेणे अत्यंत गरजेचे वाटू लागले होते. दीर्घकाळ राज्याची सत्ता निरंकुशपणे आपल्याच हातात राहिल्याने मुसलमान शासक आता ऐषआरामी, विलासी बनले होते. त्यामुळे सारख्या सारख्या लढाया करण्याची त्यांची प्रवृत्ती कमी झाली होती. परिणामी बाह्यसंघर्ष कमी होऊन धार्मिक म्हणजेच सांस्कृतिक संघर्ष तीव्र होत चालला होता.

उत्तरेकडचे, दक्षिणेकडचे आणि भारताबाहेरचे परदेशस्थ मुसलमान हे एकमेकांना श्रेष्ठ-कनिष्ठ मानायला लागले होते. स्थानिक झगड्यांचा-संघर्षांचा निकाल ते आपल्या लोकांच्याच बाजूने देऊ लागले. त्यामुळे पीर आणि दर्ग्यांची पूजा करणाऱ्या हिंदू भाविकांच्या संख्येत दिवसेंदिवस वाढ होऊ लागली. सुफी संत त्यांना आपल्याकडे आकर्षित करण्यात यशस्वी ठरू लागले होते.

पैठण शहर हे त्या काळी एक महान धर्मपीठ होते. अनेक विद्वान पंडित तेथे धर्मशास्त्राध्यापन करीत असत. म्हणून तेथे धर्मशास्त्र शिकण्यास येणाऱ्यांची संख्याही फार मोठी होती; पण तरीसुद्धा या नगरीमध्ये संत एकनाथांसारख्या शांत, सत्त्वशील, सोशिक व्यक्तिमत्त्वाच्या अंगावर पानाच्या पिचकाऱ्या टाकणाऱ्यापर्यंत या मुस्लिम माणसांची मजल गेली होती. शासन त्यांच्या बाजूनेच न्याय देत असल्याने त्यांची एवढी हिंमत होत होती.

सत्ता आणि संपत्ती मिळविण्यासाठी स्वाभिमानाची विक्री करून, मातृभूमी प्रेम गुंडाळून ठेवून परकीय शासकांची नोकरी स्वीकारण्याची स्पर्धा महाराष्ट्रातसुद्धा राजस्थानसारखीच चालू होती. शरमेची बाब म्हणजे आपल्या तरुण सुना, मुली यवनांच्या चरणी अर्पण करून पद, पैसा, प्रतिष्ठा मिळविण्याससुद्धा लोक मागेपुढे पहात नव्हते. अशा मेलेल्या मनाच्या प्रेतवत समाजात स्वाभिमान जागृत करून

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

तेजस्विता भरण्याचे, चैतन्य भरण्याचे काम संत एकनाथ महाराजांनी मोठ्या कुशलतेने केले; ज्याप्रमाणे पंजाब प्रांतात इ. स. १५६३ ते १६०६ या काळात शिखांचे धर्मगुरू संत अर्जुनसिंगजी यांनी मरगळलेला समाज जागृत केला होता, त्याच प्रकारचे हे संत एकनाथांचे कार्य होते.

परदेशी आक्रमणांनी लुळ्या-पांगळ्या झालेल्या आणि श्रद्धास्थाने भंग पावल्यामुळे निराश आणि उदास झालेल्या समाजाला संत एकनाथांच्या कार्यामुळे, त्यांच्या उपदेशामुळे नवसंजीवनी प्राप्त झाली होती.

या उदाहरणावरून आपणास असे दिसून येईल की, अगदी सनातन काळापासून भारतात ते साधु-संत होऊन गेले, ते सर्व धार्मिक साधनेत किंवा परमार्थ साधनेतच मग्न होते, असे नाही. ते फक्त व्यक्तिगत मोक्षप्राप्तीचा विचार करीत होते. समाजाचे त्यांना भानच नव्हते, असेही नाही.

या संतांनीच खरे तर समाज-संगठनाचा प्रयत्न केला. समाजातील मरगळ दूर करून त्यांच्यात स्वाभिमान भरून समाजाचा उद्धार केला. थोडक्यात म्हणजे व्यक्तीच्या हिताचे समाजकारणही त्यांनी केले. काहींनी तर थेट राजांना राजकारणातही मार्गदर्शन केले. म्हणूनच भारताची संस्कृती टिकवून ठेवण्यात तळहातावर शीर घेऊन लढणाऱ्या सैनिकांइतकेच संतांचेही स्थान महत्त्वाचे आहे.

इ. स. च्या आधीपासून भारतात सामाजिक समतेचा पुरस्कार या संतांनीच केला. केवळ ते पुरस्कार करून थांबले नाहीत तर आपल्या उपदेशामधून आणि स्वत:च्या आचरणाने या सामाजिक एकतेचा प्रचार व प्रसारसुद्धा केला.

अशा प्रकारची समतावादी दृष्टी असणाऱ्या संतांपैकी एक संत

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

म्हणजे श्री एकनाथ महाराज हे होत. त्यांचे कीर्तन ऐकण्यासाठी मुसलमान धर्माचे लोकसुद्धा येत असत, ही एक आश्चर्य वाटण्याजोगी विशेष गोष्ट होती. श्री संत नामदेवांप्रमाणेच संत एकनाथांनी महाराष्ट्राची सरहद्द ओलांडून महाराष्ट्राबाहेरही भागवत धर्माचा, समतेचा प्रसार केला. अंधश्रद्धा, दांभिकपणा, खुळ्या कल्पना, बुरसटलेल्या परंपरा, ढोंगीपणा यांसारख्या समाजघातक गोष्टींवर तिखट शब्दांत पण स्पष्टपणे कडक हल्ले चढविले.

भागवत धर्माची पताका पंजाबात नेऊन फडकवत ठेवणारे संत नामदेव यांनी इ. स. १३५० मध्ये समाधी घेतली. त्यांच्याआधी ज्ञानदेव, निवृत्तिनाथही समाधीस्थ झाले होते. या वेळेपर्यंत मुसलमान सत्ताधीशांची पकड घट्ट झाली होती. भक्त पुंडलिक, संत ज्ञानेश्वर, संत नामदेव यांनी जनमानसांच्या हृदया-हृदयांमध्ये रुजविलेल्या भागवत धर्माची स्थिती कठीण होऊ लागली. एकता, साधूता, समता सांगणारा हा धर्म क्षीण क्षीण होऊ लागला होता. मुसलमान धर्माचा प्रसार व प्रचार वाढू लागला होता.

अशा कठीण काळात हिंदू धर्माचे अस्तित्व टिकविणे आवश्यक होते. त्यासाठी जनतेची मने जिवंत रहाणे गरजेचे होते. रक्तामध्ये जोश भरणे आवश्यक होते. नेमक्या अशा अतिशय आवश्यक काळातच संत एकनाथांचा जन्म झाला होता. जणू एकनाथांच्या रूपाने भागवत धर्माला नवसंजीवनी प्राप्त झाली होती.

एकनाथांचे पणजोबा भानुदास हे परम विठ्ठलभक्त होते. ते दरवर्षी आषाढी एकादशीची पंढरपूरची वारी करीत असत. चंद्रभागा नदीकाठावरच्या वाळवंटात ते नामसंकीर्तनात अगदी तल्लीन होऊन जात असत. खरेतर भानुदास मूळचे सूर्याचे उपासक. त्यांच्या उपासनेने प्रसन्न होऊन बालपणीच सूर्याने त्यांना ब्राह्मणाच्या वेषात साक्षात

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

दर्शन दिले होते, असे म्हणतात. एकवीरा देवी ही या घराण्याची कुलदेवता होती; पण पुढे मात्र भानुदास हे विठ्ठलभक्तीतच पूर्ण रंगून गेले. त्यांच्या काळात देवगिरीचा हिंदू राजा कृष्णदेव राय याने पंढरपूरची विठ्ठलाची मूर्ती आपली राजधानी देवगिरी येथे नेली होती. ती मूर्ती भानुदासांनी आपल्या उपासनेच्या बळावर परत पंढरपूर येथे आणली.

अशा प्रकारे मुसलमान धर्मप्रचाराच्या आघाताने क्षीण होत जाणारा भागवत धर्म त्यांनी जिवंत ठेवण्याचा प्रयत्न केला. ही परंपरा खंडीत होऊ दिली नाही. भानुदास हे अतिशय दृढनिश्चयी आणि सत्त्वसंपन्न अशा व्यक्तिमत्त्वाचे होते. भानुदासांनी आपल्या मुलाचे व नातवाचे ठेवलेले नाव हे त्यांच्या सूर्योपासनेचे द्योतक आहे. त्यांच्या मुलाचे नाव चक्रपाणी आणि नातवाचे सूर्यनारायण असे होते. सूर्यनारायण यांचा मुलगा म्हणजेच संत एकनाथ होय.

सूर्यनारायण हेसुद्धा परमभक्त, विद्वान पंडित होते. काशीहून पैठण येथे येणारे विद्वान पंडित त्यांच्याबरोबर धर्मशास्त्रावर चर्चा करीत असत. या पंडितांना यातूनच सूर्याजीपंतांची थोरवी कळून येत असे. तेसुद्धा श्री विठ्ठलाचे भक्त होते. बाहेरगावाहून येणारे बहुतेक विद्वान, पंडित हे पाहुणे म्हणून त्यांच्या घरीच रहात असत.

विठ्ठल हे विष्णूचेच रूप मानले जाते. विष्णूने जे अवतार घेतले असे म्हटले जाते; त्यात आठवा अवतार श्रीकृष्णाचा होता. विठ्ठल हे श्रीकृष्णाचेंच रूप होय. सूर्य म्हणजे भग-सविता, विष्णू असे सांगितले जाते. या परंपरेत विकसित झालेला धर्म तो भागवत धर्म होय. म्हणूनच या धर्माच्या उपासनेचे दैवत श्री विठ्ठल हे आहे. अशा तऱ्हेने नाथांच्या घराण्यात पूर्वी चालत असलेली सूर्योपासना ही विठ्ठलभक्तीमध्ये परावर्तित झाली. अशा प्रकारे हा झालेला बदल ही स्वाभाविक

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

घडलेली अशीच एक क्रिया आहे, यात नवल वाटण्यासारखे किंवा उलटसुलट असे काहीही घडलेले नाही.

सूर्याजीपंतांच्या पोटी इ. स. १५३३ मध्ये फाल्गुन वद्य षष्ठीला एकनाथांचा जन्म झाला. असे म्हणतात, की भानुदास यांनी श्री विठ्ठलाला प्रार्थना केली तेव्हा श्री विठ्ठलाने त्यांना वर दिला की, 'मी तुझे वंशी अवतार । घेईन साचार निश्चिती ।' यानुसार श्री विठ्ठलांनीच भानुदासांच्या वंशात सूर्याजीपंतांच्या पोटी जन्म घेतला. एकनाथांचा जन्म गोदावरी नदीच्या काठी प्रतिष्ठान म्हणजेच पैठण नगरीत झाला. त्यांच्या आईचे नाव होते, रुक्मिणीबाई.

नाथांचा जन्म मूळ नक्षत्रावर झाला. मूळ नक्षत्र हे त्या वेळी जन्म घेणाऱ्या बाळाच्या आई-वडिलांना घातक असते, असे म्हणतात. घडलेही तसेच. एकनाथांच्या अगदी लहानपणी सहा महिन्यांच्या अंतरात त्यांच्या आईवडिलांचे निधन झाले. त्यामुळे अगदी लहानपणापासूनच त्यांचा सांभाळ, त्यांचे पालन-पोषण त्यांचे आजोबा श्री चक्रपाणी यांनी केले. स्वत:च्या जन्माविषयी नाथ एका अभंगात म्हणतात -

मुळींच्या मुळीं एका जन्मला ।
माय बापे थोर धाक घेतला ॥
कैसे मूळ नक्षत्र आले कपाळा ।
स्वयें लागलो दोहींच्या निर्मुळा ॥
शांती करिता अवघ्यांची शांती ।
मुळी लागोनिया लाविली ख्याती ॥
एका जनार्दनी मुळीच्या गोष्टी ।
माये सगटं सगळा बापचि घोटी ॥

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

पुढे नाथ मोठे झाल्यावर निरूपण करताना अशीच रूपकांची रेलचेल करून, आध्यात्मिक किंवा गूढगम्य भाषेत ते बोलत, लिहीत असत. अर्थात यात असलेले रूपक सोडले तर आपण मूळ नक्षत्रांवर जन्माला आलो व आपल्या लहानपणीच आई-वडील दोहोंचे निधन झाले, एवढा अर्थ मात्र यातून निघू शकतो.

भगवतभक्त व दृढनिश्चयी अशा आजोबा आणि पणजोबांच्या कुळांत आपला जन्म झाला म्हणून धन्य झालो, असे त्यांना वाटते, असे ते म्हणतात.

धन्य निज भाग्याची लीळा । आलो वैष्णव कुळां जन्मोनी ॥

एकनाथ जन्मले तेव्हा ते चांगले गुटगुटीत होते. थोडे मोठे होऊन खेळू लागल्यावर त्यांच्या चेहऱ्यावर विशेष तेज दिसू लागले. ते आजी-आजोबांच्या मांडीवर खेळत तेव्हा स्वत: हसत राहात व दुसऱ्यांनाही हसवत राहात असत. घरातल्या सगळ्यांचा ते अतिशय लाडके बाळ झाले होते. त्यांना खेळविताना किंवा त्यांच्याबरोबर खेळताना सगळ्यांनाच आनंद व्हायचा, विरंगुळा वाटायचा.

एकनाथांचे आई-वडील दोघेही वारले; तेव्हा आजोबा चक्रपाणी यांना फार मोठा मानसिक धक्का बसला. अगदी लहान मुलासारखे ते मोठमोठ्याने रडत होते. पैठणमधील अनेक विद्वान, पंडित, प्रतिष्ठित लोक येऊन त्यांची समजूत काढीत होते; तरी पण त्यांचा शोक त्यांना आवरता येत नव्हता.

देवगिरी किल्ल्याचे किल्लेदार असलेले जनार्दनस्वामी हे या घराण्याचे जुने मित्र. ते दौलताबाद येथे रहात असत. त्यांना ही बातमी कळाली. ते स्वत: येऊन चक्रपाणींना भेटले. त्यांची समजूत काढली आणि म्हणाले, "दु:ख आवरा, विधिलिखित घडून गेलं. पण लक्षात ठेवा, हा मुलगा मोठा भाग्यवंत आहे. तो अनाथ असला तरी पुढे

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

तोच अनाथांचा नाथ होईल. मोठं नाव कमवेल. माझा आशीर्वाद आहे.''

❋ मुंज - बालपण - शिक्षण ❋

आता एकनाथांचे बालपण आजोबांच्या देखरेखीखाली जाऊ लागले. आजोबांचा सारा जीव एकनाथांवर लागला. एकनाथ थोडे मोठे झाल्यावर जर सोबत्यांबरोबर खेळायला बाहेर गेले आणि लवकर घरी आले नाही तर आजोबांना खूप काळजी वाटत असे. लगेच त्यांची शोधाशोध सुरू होत असे.

चक्रपाणींच्या कुटुंबातले सारे वातावरण कसे शुद्ध, पवित्र होते. श्रद्धामय आणि मंगलमय अशा या वातावरणाचा प्रभाव बाल एकनाथांच्या मनावर खोलवर घडत होता. घरातील ईश्वरभक्तीचे संस्कार लहानपणीच त्यांच्या मनावर घडत गेले.

एकनाथ लहानपणापासूनच श्रद्धावान होते. त्यांची बुद्धीही अतिशय तरल होती. भजन, कीर्तन, पूजाअर्चा, संध्या, प्रवचन, नामसंकीर्तन यांत यांना विशेष रुची होती. ग्रंथ, पुराणे ऐकण्याची त्यांना आवड होती. ईश्वरोपासनेकडेच त्यांचा जास्त ओढा होता. लहानपणापासूनच दया, परोपकार, सहनशीलता, उच्चनीचता न मानणे, जातीय किंवा वर्णीय भेद न मानणे, समदृष्टी या गुणांचा त्यांच्या व्यक्तिमत्त्वात चांगल्या प्रकारे विकास झालेला दिसून येत होता.

'जगाच्या कल्याणा संतांच्या विभूती । देह कष्टविती उपकारे ॥'

ही उक्ती संत एकनाथांच्या बाबतीत तंतोतंत खरी ठरलेली दिसून

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

येते. अर्थात मुलाचे पाय पाळण्यात दिसतात, असे म्हणतात; त्याप्रमाणे लहानपणापासूनच त्यांच्या या गुणांची प्रचिती जनसामान्यांना येऊ लागलेली होती.

एकनाथ सहा वर्षांचे झाल्यानंतर त्यांची मुंज करावी, असे त्यांचे आजोबा चक्रपाणी यांना वाटू लागले. मग त्यांनी मुहूर्त निश्चित करून त्यांची मुंज करून टाकली. मुंज लावण्यासाठी गुरुजी म्हणून पैठणमधील विद्वान पंडित काशिनाथ शास्त्री यांना बोलावण्यात आले होते. त्यांनी एकनाथांना गायत्री मंत्राची दीक्षा दिली. त्यानंतर आजोबांच्या देखरेखीखाली काशिनाथ शास्त्री यांच्याकडेच त्यांचे शिक्षण विधिवत सुरू झाले.

काशिनाथ शास्त्री मनमिळावू होते. बाहेरगावचे अनेक विद्यार्थी त्यांच्याकडे विद्याध्ययनासाठी येत असत. याच पाठशाळेत एकनाथ शिकत असत. त्या काळात शिकण्यासाठी छापील पुस्तके, वह्या नव्हत्या. छापील धर्मग्रंथ नव्हते. गुरुजीच तोंडाने थोडा थोडा भाग सांगायचे. याला संथा देणे असे म्हणत. गुरुजींनी संथा दिली म्हणजे मग विद्यार्थी तेवढा भाग घोकून घोकून पाठ करीत. तो भाग पाठ झाल्यानंतरच पुढची संथा मिळत असे. एकनाथांची बुद्धी अतिशय तीव्र होती. सर्वांत अगोदर त्यांची संथा पाठ होत असे.

लहानपणापासूनच एकनाथांची वृत्ती अंतर्मुख होऊन विचार करणारी होती. रोजच्या आचरणातील, रूढीपरंपरांतील, सांस्कृतिक पद्धतीतील मर्म जाणून घेण्याची चौकस बुद्धी त्यांच्याकडे होती. याचा अर्थ ते लहान मुलांसारखे खेळ न खेळता, न बागडत नुसता विचार करीत असत, असा मात्र मुळीच नाही. ते भरपूर खेळ खेळले. गोटे मांडून किंवा एखादा दगड ठेवून त्याचे देव करायचे व मोठी

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

मोठी माणसे ज्या प्रकारे देवांची पूजा करतात तशीच ते पूजा करीत असत.

कीर्तन करणाऱ्या एखाद्या हरदासाची ते उत्तम प्रकारे नक्कल करीत. तसेच एखादी लांब काठी घेऊन, त्याला भगवे कापड बांधून त्याची पताका करीत व ती पताका खांद्यावर घेऊन लुटूपुटूचे पंढरपूरच्या यात्रेलासुद्धा जाऊन येत असत.

आपण एकनाथांच्या काव्यप्रपंचाचा अभ्यास केला तर दिसून येते, की त्यांनी आपल्या साहित्यात अनेक खेळांचा त्यातील बारकाव्यांसह रूपकात्मक उपयोग केला आहे. हे सर्व खेळ ते स्वत: खेळलेले असल्याशिवाय त्यातील बारकावे, त्यातील खुबी ते जाणू शकणार नाहीत. यानुसार टिपऱ्या, विटी-दांडू, लगोरी, चेंडू, भोवरा, लपंडाव, सुरकांडी, वावडी, एकीबेकी, हमामा, हुंबेरी, हुतूतू इ. खेळ ते खेळले असले पाहिजेत. या खेळांच्या रूपकांमधून अज्ञानांना समजेल अशा तऱ्हेने परमार्थाची उकल करून त्यांनी सांगितली आहे.

विटीदांडूचा खेळ ते आपल्या सोबत्यांबरोबर अगदी तल्लीन होऊन खेळले. हाच विटीदांडूचा खेळ प्रौढपणी बदललेल्या मनातही रंगत राहिला आणि मग ते आपल्या सवंगड्यांना हा विटीदांडूचा आगळावेगळा खेळ खेळायला बोलावू लागले. ते म्हणतात, मित्रांनो, आपण अबक, दुबक, तिबकचा त्रिगुणांचा खेळ मांडू या - यासाठी सत्त्वगुणांची विटी करू या. विटी टोलविण्यासाठी शुद्ध भावांचा दांडू हातात धरू या. ते त्यांच्या पद्यात म्हणतात --

"अबक दुबक तिबक गड्या त्रिगुण खेळ मांडू ।
खेळे विटी दांडू, आता खेळे विटी दांडू ।
सत्त्व विटी धरू हातां, भाव धरी दांडू ।।"

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

अशा तऱ्हेने लहानपणीच्या खेळलेल्या विटीदांडूचे रूपक करून त्याद्वारे त्यांनी अध्यात्म सांगण्याचा यशस्वी प्रयत्न केलेला आपणास दिसून येतो.

लहानपणी ते एकीबेकीचा खेळ मन लावून खेळले; पण मोठेपणी लहानपणीची मनातील एकीबेकीच्या भावना शिल्लक न रहाता ती आध्यात्मिक शून्यात बदलून जाते. शून्य म्हणजे जेथे एकीही नसते, किंवा बेकीही नसते. तिथे शून्याला फाटे फुटून समोर ब्रह्मांडच उभे रहाते. ते म्हणतात-

"एकी बेकी पोरा सांग झडकरी ।
एकी म्हणता जिंकिशी, बेकी म्हणता हारी ॥
नव्हे काई बाई, तिथे झाले एक शून्य ।
त्यासी फाटा फुटता, मग लेखां आले जाण ॥"

अशा तऱ्हेने खेळण्याच्या बालवयातसुद्धा खेळता खेळता त्या खेळाचे व आजूबाजूचे ते अतिशय सूक्ष्म निरीक्षण करीत असत. तसेच त्यांना चौकसबुद्धीची देणगीसुद्धा ईश्वराकडून मिळालेली होती.

पैठण शहराला एक धर्मपीठ, सांस्कृतिक केंद्र म्हणून त्या काळात मान्यता मिळालेली असल्याने या क्षेत्री अनेक जपी, तपी, साधू-संन्याशी, बैरागी, योगी, भट, भिक्षुक, प्रवचनकार, कीर्तनकार, रामदासी अशी अनेक प्रकारची मंडळी येत असत. एकनाथांचे या साऱ्यांवर चांगले लक्ष असे. ते बोलतात कसे, चालतात कसे, ते हालचाल कशी करतात इ. चे ते अतिशय सूक्ष्म निरीक्षण करीत असत. ते त्यांच्या प्रवचनाला जात, कीर्तनाला जात. तेथे ते अगदी शेवटपर्यंत बसत. ते सर्व मन लवून ऐकत. पण एकनाथांना हे लोक आणि त्यांचे बोलणे अहंकारी, मत्सरी, दांभिक आहे, कोरडे आहे, असेच वाटत असे. त्यांच्या बोलण्या-वागण्यात एकनाथांना भक्तीचा

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

ओलावा किंवा प्रेमाचा उमाळा कधीच दिसून आला नाही. त्यांपैकी कोणालाही अज्ञ जनांबद्दल आपुलकी नाही. परस्परांविषयी प्रेम नाही. देवाबद्दल मनापासून आस्था किंवा ओढ नाही. खरे तर लोकांचे लक्ष आपल्याकडेच वेधून घेणाऱ्या, आपापले श्रेष्ठत्व सिद्ध करण्याचा, स्वत:चे अस्तित्व प्रस्थापित करण्याचा प्रत्येकजण प्रयत्न करीत होता.

हे लोक स्वत:ला जपी, तपी, योगी म्हणवितात, पण; सात्त्विक प्रसन्नतेचे तेज कोणाच्याही चेहऱ्यावर दिसत नव्हते. यांना साधे आपल्या रागालाही जिंकता आले नव्हते; तर मग संपूर्ण मनाला जिंकण्याविषयी बोलणेच नको. ते सर्वत्र आपला नुसता अहंकारच मिरवितात व त्यामुळे लोकांनी यांच्या मागे मागे येण्याऐवजी हेच लोक लोकांच्या मागे मागे फिरत रहातात. जे स्वत:ला साधू-बैरागी म्हणवतात, त्यांना जटा पिंजारून, गांजा ओढत बसण्याची गरजच काय असते? हे योगी तासन् तास आसन घालून लोकांसमोर बसतात; मग हे एकांतात ध्यान-धारणा कधी करतात?

या बालवयातच एकनाथ जे पहात असत, त्याबद्दल ते अंतर्मुख होऊन विचार करीत असत; मग नाना शंकांनी त्यांचे मन घेरून टाकले जायचे. गोदामाईचे स्नान करून पावन होण्याच्या इच्छेने अनेक भोळे-भाबडे भाविक भक्त पैठण येथे येत असत; त्या वेळी ब्राह्मणभिक्षुकांची त्यांच्या मागे नुसती झुंबड लागलेली असे. त्या वेळी त्या बिचाऱ्यांना देवप्राप्तीचा खरा मार्ग दाखविण्याचे सोडून ते ब्राह्मण त्यांना कर्मकांड करायला लावत. अशा तऱ्हेने एकदा हातात आलेल्या या भक्तांना चरकातून पिळून काढल्यासारखे पिळून काढीत असत.

समाजातील धार्मिक-पारमार्थिक जीवनाचे हे लोक नेतृत्व करतात; मग ते हातात पाणी घ्या, आचमन करा, पाणी सोडा, बुडी

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

मारा, नाक धरा, कान धरा, डोळे मिटा, प्रदक्षिणा घाला, नाक घासा, कान धरून उड्या मारा, अशा प्रकारच्या अनेक गोष्टी का करायला सांगतात, असा प्रश्न एकनाथांच्या बालमनात उभा रहात असे. असल्या गोष्टी खरोखरीच परमार्थात सांगितल्या आहेत काय? असल्यास त्या समजावून न सांगता नुसत्याच करायला का सांगतात? आणि अशा गोष्टी करताना लोकही का विचार करीत नाहीत? परमेश्वरप्राप्तीसाठी मध्यस्थाची गरज असते का? परमेश्वर स्वतःच्या अनुभवाने प्राप्त करून घेण्याची गोष्ट असते ना?

कीर्तनकार, प्रवचनकार रामायण-महाभारताच्या शौर्य-पराक्रमाच्या गोष्टी मोठ्या रंगवून सांगतात. लोक त्या मनापासून ऐकतात. त्यावर चवीने गप्पासुद्धा मारतात; पण मग हे लोक परक्यांची जुलमी राजवट मुकाटपणे का सहन करतात? आपला देव, धर्म, उपासना, श्रद्धा, शुद्ध सात्त्विक भाव, भक्ती सोडून हे लोक पीराच्या भजनी का लागतात? अवलिया, फकिरांना गुरू का करतात? आपल्या धर्मामध्ये यांना सात्त्विक विचारआचारांचा भरंपूर अनुभव स्वतः घेतलेला गुरू भेटत नाही काय? असे अनेक प्रश्न त्या बालबुद्धीमधून मनाच्या कप्प्यात प्रवेश करीत असत.

एकनाथांच्या मनात येत असे, की आपल्या लोकांचा खऱ्या धर्मावर, खऱ्या परमार्थावर, खऱ्या व शुद्ध नैतिक आचरणावर विश्वासच राहिलेला नाही. धर्म आणि परमार्थाची केवळ बाह्यांग, तीही फक्त देखावा करण्यासाठीच यांनी जाणून घेतली आहेत. खरे म्हणजे ब्राह्मण, विद्वानांनी ज्ञान साधनेने, उच्च विचारांनी, शुद्ध आचरणाने समाजाचे नेतृत्व करायचे, परमार्थ सांगावयाचा; पण तो कसा? विचारांना प्रवृत्त करणारा! हे सर्व सोडून ही ब्राह्मण मंडळी दक्षिणेवर खूष असतात. जास्तीत जास्त दक्षिणा उकळण्याचा प्रयत्न

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

करतात.

जर या लोकांना दक्षिणा कमी मिळाली तर शिव्याशाप देतात. काय ही या लोकांची अधोगती? हे विद्वान लोक अज्ञानी लोकांना परमार्थ सोपा करून सांगून, तो आचरणात आणावयास सांगण्याचे सोडून देतात व अर्थ न समजता पाठांतर करायला सांगण्यात धन्यता मानतात आणि या गोष्टींचा ते अहंकार बाळगतात; याला काय म्हणायचे? कीर्तनकारांनी रसाळवाणीने शुद्ध, सात्त्विक, उदात्त चरित्राच्या माध्यमातून देवाची भक्ती डोळस करायची, ती भक्ती वाढवायची, हे सोडून उलट ओंगळ, वासनाभरीत घटनाच चवीने सांगतात.

आणि संन्याशी ? संन्यस्त वृत्तीचा अमोल आदर्श समाजासमोर ठेवायचे सोडून भगवी वस्त्रे नेसण्याचा देखावा करतात. मुंडणाचे सोंग करतात; पण मनात? वासनांचा, विकारांचा, बुजबुजाट झालेला असतो. यांची स्थिती 'रडती पोटासाठी, झालो म्हणे संन्याशी' अशीच असते. किंवा त्यांची ध्यान-धारणा म्हणजे 'घेवोनी संन्यास, ध्यान पै स्त्रियांचे' असे असते.

धर्म म्हणजे समाजाला उच्च विचार करायला लावणारा, सत्त्व आणि स्वत्व जागृत करणारा आणि अंत:करणवृत्तींची जोपासना करणारा असतो; तर परमार्थ सर्व मने उन्मन करणारा भक्तियुक्त मनाने, सत्त्वबुद्धीने, त्यागी वृत्तीने आत्मानंदाचा, उपभोगाचा मार्ग दाखविणारा असतो, हे या विद्वान मंडळींना का व कसे कळत नाही? अशा अनेक प्रश्नांचे काहूर बालमनात उठल्यावर एकनाथ एकांतात बसून चिंतन करीत असत. मग अशा वेळी अज्ञ, दीन, पतित, उपेक्षित जनांचा त्यांना कळवळा येत असे.

ही दुनिया स्वार्थी आहे. गरीबांचा कोणालाच कळवळा येत

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

नाही. तामसी दैवतांची उपासना करतात, मुक्या जीवांचा बळी देऊन देव प्रसन्न होतो व मनोकामना पूर्ण होतात, असे मानतात. महार-मांग, डोंबारी, कोल्हाटी, कैकाडी, भूत्ये, वाघे, अडबंग, वेसकर, जागले अशा किती तरी जाती-जमाती अज्ञानात जगत आहेत. त्यांना खरा धर्म, खरा परमार्थ शिकवायला हवा आहे. पण हे काम कोण करणार?

स्वत:ला उच्चवर्णीय म्हणविणारांनी देवधर्म, परमार्थाचे रूपांतर कर्मकांडात केले. सामान्य अज्ञजनात देवधर्म तामसी व विपरीत स्वरूपात आला. त्यात परधर्माची राजवट; त्यामुळे राजसत्तेच्या जोरावर आपल्या धर्मावर आघात झाले तर नवल ते काय? यातून सुटण्याचा मार्ग कोणता? असे विचार एकनाथांच्या बालमनात नुसते थैमान घालीत असत.

❋ गुरूंसाठी मार्गदर्शन ❋

बाल एकनाथांना आता सारखे वाटू लागले, की एकांतात बसून थोर पंडितांना आपल्या मनातले प्रश्न विचारून समाधान करून घ्यावे. परमार्थ, अध्यात्म, शास्त्र या साऱ्यांचे ज्ञान मिळवावे; पण त्यांचे प्रश्न ऐकून भले भले पंडित, शास्त्री, वेदांती गप्प बसत. त्यांची स्तुती करत; पण त्यामुळे एकनाथांचे समाधान न होता निराशाच होत असे. त्यांचे मन सारखा विचार करीत असे की स्वानुभवाला उतरणारे ज्ञान आणि गरिबांच्या कल्याणाचा उपाय सापडण्यासाठी कोणाला शरण जावे? यासाठी रोज सकाळी ते शिवालयात जाऊन चिंतन करीत बसत असत.

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai



असेच एक दिवस अंतर्मुख होऊन एकनाथ चिंतन करीत बसले असता तेथे एक सत्त्वशील वृद्ध आले. त्यांचे नाव होते, हनुमंत भटजी. ते मुखाने सारखा 'ॐ नमः शिवाय' चा जप करीत होते. गाभाऱ्यात जाऊन पूजा, दर्शन करून ते बाहेर आले. त्यांनी पाहिले, एक अकरा-बारा वर्षांचा पोरगा डोक्यावर टाळूच्या मागे केसाचा गोल घेरा, लांब शेंडीची गाठ मारलेली,करवत काठी धोतर नेसलेला, अंगात बाराबंदी घातलेली, तोंडावर विलक्षण तेज व शांती पसरलेली होती.

हनुमंत भट त्यांच्या दिशेने निघाले. तसे एकनाथांनी उठून त्यांना नमस्कार केला. हनुमंत भटांना शिवाचा अनुग्रह प्राप्त झाला होता. त्यांनी एकनाथांच्या हातावर प्रसाद ठेवला. मुलाचा नम्रभाव त्यांना आवडला; पण तेजस्वी चेहऱ्यावरील चिंता त्यांना जाणवली.

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

बोलक्या डोळ्यांतली आर्तता त्यांना कळून आली. त्यांच्याशी त्यांना बोलावं वाटलं. त्यांनी विचारलं,

"बाळ, तुझं नाव काय?"

"माझं नाव एकनाथ आहे; पण आजोबा मला एकोबा असं म्हणतात; तर मित्र मला एक्या एक्या म्हणून चिडवतात."

हनुमंत भटांना त्याचा चुणचुणीतपणा आवडला. उत्तर ऐकून त्यांनी स्मित हास्य केलं. त्यांनी पुढं विचारलं –

"घरी कोण कोण आहेत तुझ्या?"

"आजी आणि आजोबा. आईवडील नाहीत. देवाघरी गेलेत." त्यांनी सांगितलं.

"नाव काय तुझ्या आजोबांचं?"

"पंडित चक्रपाणी म्हणतात त्यांना." एकनाथांनी उत्तर दिलं.

"अरे, तुमचे कुळ तर फार मोठे, प्रतिष्ठित आहे." हनुमंत भट म्हणाले.

"पण पंत, मला एक सांगाल का, की केवळ कुळ चांगलं असलं की माणूस मोठा होतो का?" एकनाथांनी विचारलं.

हनुमंत भट म्हणाले, "नाही, तसं नाही. माणूस आपल्या गुणांनी मोठा होतो; पण मोठ्या कुळात गुणवान होण्याची संधी चांगली व लवकर मिळते, म्हणूनच आपल्या कुळाचा प्रत्येकाने अभिमान धरला पाहिजे. पण काय रे, तुझे आजोबा तुझ्याकडून खूप अभ्यास करून घेत असतील ना?"

"होय, त्यांना आळस आवडत नाही. अभ्यासात आळस केला तर खूप खूप ठोकून काढतात. ते माझा खूप अभ्यास करून घेतात." एकनाथ म्हणाले.

"मग किती वेळा मार खाल्लास आजोबांचा?" हनुमंत भटांनी

Digitization by Arya Samaj Charitable Foundation Trust, Chennai

विचारलं.

"एकदाही नाही. कारण मी एकदाही अभ्यास चुकविला नाही. माझ्या आजोबांनी मला रामायण, महाभारत, चार वेद, सुभाषिते शिकविली आहेत."

"एकनाथ वयाच्या मनानं चांगलं पाठांतर झालय तुझं. "- हनुमंत भट.

"पण पंत, पाठांतराने माणूस ज्ञानी होतो, शहाणा होत नाही."

"असं का म्हणतोस?"

"कारण द्रोणाचार्यांनी कौरव-पाडंवांना शिकवलं. पांडव चांगले झाले; पण कौरव दुष्ट राहिले. भर सभेत द्रौपदीची बेअब्रू करताना त्यांना काहीच वाटलं नाही." एकनाथ हनुमंत भटांना म्हणाले, "पंत, तुम्ही द्याल माझ्या प्रश्नांचं उत्तर."

"बेटा एकोबा, तुझ्या प्रश्नांना उत्तर द्यायला, माझ्याजवळ शब्द नाहीत. तू एखादा चांगला गुरू करून घे. त्याच्याकडून अनुग्रह घे. असे मला वाटते." हनुमंत भट म्हणाले.

"पण माझा गुरू होण्यासाठी मी कुणापुढे हात पसरू? कुणाचे पाय धरू?" एकनाथ केविलवाणे म्हणाले.

"खरं सांगू? तुझ्यासारख्या जिज्ञासू, मुमुक्षू, ज्ञानवंत आणि विचारवंताचा गुरू होऊ शकेल, असे कोणी पैठणमध्ये तरी मला दिसत नाही. पोट भरण्यासाठी विद्या विकण्याचा व्यापारच चालविलाय त्यांनी. आज ब्रह्मण वैश्य झालाय. ही छुपीछुपी वैश्यगिरी म्हणजे विषवल्ली आहे. ती फार तापदायक आहे. या विषवल्लीला कधीच गोड फळे येणे शक्य नाही." हनुमंत भट म्हणाले.

"पण मग पैठणबाहेर कुणी अशी व्यक्ती, असा महामानव आहे का?" एकनाथ.

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

"हो, आहेत. देवगिरीचे जनार्दन स्वामी. पण मला शंका आहे, तू त्यांना जरी गुरू मानलेस तरी ते तुला शिष्य मानतील कां याची !" हनुमंत भट म्हणाले.

"तुम्ही त्याची चिंता करू नका. आपले माझ्यावर फार फार उपकार झाले." असे म्हणून एकनाथांनी त्यांच्या चरणावर डोके टेकवले.

हनुमंत भटांनी त्यांना प्रेमभरे उठवून पोटाशी धरून, मायेने कुरवाळले. पाठीवर हात फिरवत, परत एकनाथांच्या कानात म्हणाले, "देवगिरीचे जनार्दनस्वामी तोच थोर पुरुष तुला स्व-पर कल्याणाचा मार्ग दाखवील."

❋ गुरूंचे चरण धरले ❋

हनुमंत भटांनी गुरूंचे नाव व ठिकाण सांगितले; त्या दिवसापासून एकनाथांना गुरुचरणाची ओढ लागली होती. त्या चरणांच्या कृपाप्रसादाशिवाय मनातील खळबळ थांबणार नव्हती, शंकांचं समाधान होणार नव्हतं. मनाला शांती लाभणार नव्हती. म्हणतात ना, 'गुरूविन कांही सापडेना सोय । धरावे ते पाय आधी आधी ॥' गुरूप्रसादाशिवाय ज्ञान नाही. ज्ञानाशिवाय भक्ती अपुरी; मग परमार्थ साधन कसे व्हावे? कारण हे जग म्हणजे जणू कांही एक माया बाजार आहे. सर्वत्र भुलभुलैया आहे. यातून बाहेर पडण्याचा मार्ग गुरूशिवाय कोण दाखविणार? 'गुरू बिन कोणे बताये बाट? । बडा बिकट यमघाट ॥

या ओढीमुळेच एक दिवस सकाळी नेहमीप्रमाणे शिव मंदिरात

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

गेलेले एकनाथ घरी परत आलेच नाहीत. घरातून बाहेर पडल्यानंतर त्यांनी भगवान शंकराचे दर्शन घेतले. यश मिळविण्यासाठी देवाचा आशीर्वाद मागितला. मंदिराच्या बाहेर आले आणि त्या बारा वर्षांच्या बाळ एकनाथांची पावले देवगिरीचा रस्ता चालू लागली. घरी कोणाला न सांगता, न विचारता, न कळवता चालले होते. मनात दृढ विश्वास होता. भरपूर आत्मविश्वास होता. जिद्द होती. कष्ट करण्याची तयारी होती. आत्मज्ञानप्राप्ती, लोककल्याणाच्या मार्गाच्या प्राप्तीची प्रचंड तहान होती. काहीही झाले तरी गुरूचरण धरून गुरूप्रसाद प्राप्त करण्याची आकांक्षा होती.

रस्त्यात काही खायला नाही. नव्हे भूकच लागत नव्हती. गुरूंच्या ओढीने तहान-भूक हरपून गेली होती. रस्त्याने झरा, नदी, विहीर दिसली तर थंडगार, मधुर पाणी प्यावे, थंड पाण्याने सकाळ-संध्याकाळ अंघोळ करावी. रात्र पडेपर्यंत मार्गक्रमण करावे, रात्री गावातील मंदिरात पडावे. सकाळी परत चरैवेती, चरैवेती सुरू..

एकनाथांनी पक्के ठरविले होते, गुरूचरणाची प्राप्ती झाली पाहिजे. त्यांच्या कृपाप्रसादाने आत्मज्ञानाची पहाट आयुष्यात उगवली पाहिजे. त्याशिवाय आता माघारी फिरणे नाही. एकनाथांच्या मनात आता आजी-आजोबांच्या प्रेमाची, मायेची ओढ अजिबात राहिली नव्हती. तहानभूक हरपली होती. मनात कशाचेही भय उरले नव्हते. त्यांना पाहिजे होता, त्यांचे जीवन उजळवून टाकणारा अंतःकरणातील आत्मप्रकाश. तो कुठे मिळणार आहे, ते कळलं होतं. आता एकच ध्यास, फक्त तिथंपर्यंत पोहोचायचे, आत्मज्योतीचा प्रकाश मिळवायचा.

एकनाथ सलग चार दिवस चालत होते. त्यांच्या अंगात प्रचंड उत्साहाचा संचार झाला होता. चार दिवसांच्या पायपीटीनंतर ते एकदाचे

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

देवगिरी येथे येऊन धडकले. गावाच्या धर्मशाळेत त्यांना दोन संन्याशी दिसले. त्यांनाच एकनाथांनी विचारले, "आपणापैकी जनार्दन स्वामी कोणते? तेव्हा कुचेष्टेच्या स्वरात ते दोघे हसू लागले. त्यांपैकी तरुण संन्याशी म्हणाला, "का रे बाबा, तुला काय करायचे आहेत जनार्दन स्वामी?"

"मला त्यांना भेटायचे आहे." एकनाथ धीटपणे बोलले.

आता प्रौढ संन्याशी तरुण संन्याशाला म्हणाला, "जाऊ दे रे, अजून लहान मूल आहे. काही माहीत नाही त्याला."

तरीही तो तरुण संन्याशी म्हणाला, "तू त्यांचा कोणी नातेवाईक आहेस? "

"नाही. पण नातं निर्माण करण्यासाठीच आलो आहे. कुठं रहातात ते? मला फक्त तेवढंच सांगा."



Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

आता तो प्रौढ संन्याशी समजावणीच्या सुरात म्हणाला, "अरे बाबा जनार्दन स्वामी म्हणजे या किल्ल्याचे किल्लेदार आहेत, किल्लेदार. त्यांना सहजासहजी कोणालाच भेटता येत नाही आणि एवढा थोर माणूस काय अशा धर्मशाळेत रहातो होय? त्या समोरच्या किल्ल्यावरच त्यांचा प्रचंड मोठा वाडा आहे.

बस्स ! एवढं कळायचा अवकाश ! त्या संन्याशांना वंदन करून लगेच एकनाथांनी जनार्दनस्वामींच्या वाड्याकडे धूम ठोकली.

वाड्याच्या दरवाज्याजवळ दोन पहारेकरी होते. वाड्याचा प्रचंड मोठा दरवाजा बंद होता. येणारे-जाणारे छोट्या दिंडी-दरवाज्याने जात-येत होते. पहारेकऱ्यांनी दरवाज्यातच एकनाथांना अडवले. अत्यंत विनीत भावाने त्या भाले घेऊन उभे असलेल्या पहारेकऱ्यांना एकनाथ म्हणाले, "किल्लेदार जनार्दनस्वामी इथेच रहातात ना ? हा त्यांचाच वाडा आहे ना?"

त्या दोन्ही रक्षकांनी एकदा आपले दोन्ही डोळे मोठे करीत त्यांच्यासमोर धीटपणे उभ्या असलेल्या एकनाथांना पायापासून डोक्यापर्यंत नखशिखांत न्याहाळून पाहिले. मग म्हणाले, "होय, हा त्यांचाच वाडा आहे; आणि तेही इथेच रहातात. बोला, काय काम आहे आपलं त्यांच्याकडं?'

'एका महत्त्वाच्या कामासाठी मला त्यांना भेटायचं आहे?" एकनाथांनी सांगितलं. 'विचित्रच आहे' असा भाव चेहऱ्यावर आणून तो नाथांना म्हणाला, "नाही भेटता येणार त्यांना."

"पण कां? मला त्यांची भेट घेणं अत्यंत गरजेचं आहे. अत्यंत महत्त्वाचं काम आहे माझं त्यांच्याकडे." एकनाथ नम्रपणाने बोलत होते.

"आधी सांगावा धाडला होता का? परवानगी घेतली होती कां?

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

आणि ते काही असलं तरी दोन तासांनी ये, मग पाहू या.'' पहारेकरी म्हणाले.

नाथ म्हणाले, ''तर मग ठीक आहे. मी दुरून आलो आहे. इथं माझं कोणी नाही. कोणी ओळखीचंही नाही. जाणार तरी कुठं? दोन तास इथेच बसून रहातो.''

हे बोलणं ऐकून जनार्दन स्वामींच्या पत्नी वाड्याच्या सज्जामध्ये येऊन उभ्या राहिल्या होत्या. त्यांनी हा संवाद ऐकला होता. छोट्या एकनाथांचा धीटपणा त्यांना आवडला होता. तेजस्वी चेहऱ्याने त्यांना भुरळ घातली. त्यांच्या करारीपणांचं, दृढ निश्चयाचं त्यांना नवल वाटलं होतं. त्यांनी पहारेकऱ्यांना वरूनच हुकूम केला, त्या पोराला आत पाठवून द्या.

पहारेकऱ्यांना आश्चर्य वाटलं. दिंडी-दरवाजा उघडून ते बाजूला उभे राहिले. एकनाथ दिंडी-दरवाजातून आत गेले. दरवाजा परत बंद करून रखवालदार उभे राहिले.

किल्लेदारीणबाईंनी त्याला बसायला सांगून नाव विचारलं, कोठून आला, याची चौकशी केली.

''माझं नाव एकनाथ. आजोबा एकोबा म्हणतात. मी पैठणहून आलो आहे.'' एकनाथांनी निर्भयपणे उत्तर दिले.

'पैठणहून? कोण कोण आलात तुम्ही? बरोबरचे लोक कुठे राहिलेत? ते जर बाहेर उभे असतील तर बोलावून घे त्यांना आत.'' किल्लेदारीणबाई म्हणाल्या.

''माझ्यासोबत कोणीच नाही. मी एकटाच आलो आहे !'' एकनाथ.

''बरोबर कोणीच नाही? पैठणहून एकटाच आलास?'' किल्लेदारीणबाईंनी आश्चर्यचकित होत विचारलं.

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

"होय." एकनाथ म्हणाला,

"बरं, कसा आलास?" किल्लेदारीणबाई.

"देवानं दिलेल्या दोन पायांनी चालत आलो." एकनाथ.

एकनाथांचे उत्तर ऐकून किल्लेदारीणबाई सर्दच झाल्या. पैठण ते देवगिरी ... हे एवढं मोठं अंतर हे चिमुकलं, धिटुकलं पोर चालत येतं म्हणजे कमाल आहे त्याच्या धिटाईची ! त्याच्या मनोनिग्रहाची. पुढं विचारलं,

'मग अंघोळ?'

"केली. काल संध्याकाळी. एका ओढ्यात."

"बरं, तुला पाणी काढून देते. स्नान करून घे. थोडा फराळ कर, तोपर्यंत गुरुपादुकांची पूजा करून स्वामी परत येतीलच." किल्लेदारीणबाई म्हणाल्या. किल्लेदारीणबाईंच्या आज्ञेप्रमाणे एकनाथांनी स्नान-संध्या केली. माऊलीने दिलेल्या गरमागरम अन्नाचे दोन घास प्रेमापोटी त्यांचा आदर म्हणून पोटात घातले आणि बुरजांकडे धूम ठोकली; कारण त्यांच्या मनाला एकच ध्यास होता, तो म्हणजे कधी एकदा गुरुमाऊलींचं दर्शन होईल.

किल्ल्याच्या एका तटाजवळ त्यांनी पाहिले, की एक धिप्पाड देहाचा, बलदंड शरीराचा, एक तेजस्वी पुरुष गुरुपादुकांची पूजा करीत बसला आहे. बलदंड शरीर, रेशमी पितांबर नेसलेले; डोक्यावर केसांचा गोल घेरा; त्यात लांब शेंडी. त्याने मनात ताडले, की नक्की हेच जनार्दन स्वामी असावेत. पण हे असे? पण त्यांच्या मनातल्या प्रश्नाची दखल घ्यायला, तेथे अन्य दुसरे कोणीच नव्हते; मग तेथेच एक दगड पाहून तो स्वामींकडे नजर देऊन पहात बसला.

जनार्दन स्वामींची समाधी लागली होती. कोठलाही आवाज करून समाधिभंग करणे योग्य नव्हे, हे एकनाथांनी जाणले. समाधी

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

उतरण्याची वाट पहाण्याशिवाय दुसरा मार्गच शिल्लक नव्हता. जसजसा वेळ चालला, तसतसा एकनाथांचे मन अस्वस्थ होत होते. शेवटी स्वामीजी समाधीतून बाहेर आले. स्वामींनी त्याला पाहिले. एकनाथांनी उठून त्यांचे दर्शन घेतले.

स्वामींनी गंभीर आवाजात विचारले, "पोरा, कोण रे तू?"

"माझं नाव एकनाथ!" एकनाथ म्हणाला.

"काही काम आहे वाटतं? दरबारात वाट बघ आमची थोडा वेळ." स्वामी म्हणाले.



मग एकनाथ दरबाराच्या हॉलमध्ये जाऊन वाट पहात थांबला. थोडा वेळ गेला आणि जोड्यांचा कर्रर कर्रर असा आवाज आला. दारावरचे द्वारपाल दोन बाजूला झाले व आदबीने उभे राहिले. भरदार उंचीपुरी देहयष्टी, गोरा रंग, तेजस्वी पण करारी मुद्रा, कणखर देहयष्टी, भारदार व्यक्तिमत्त्वाचे स्वामी तेथे आले. पायघोळ अंगरखा, करवत-

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

काठी धोतर, जरीकाठी उपरणं, कमरेला तलवार, कपाळावर आडवं गंध, कानात भिकबाळी, भरदार व रुबाबदार भिशा, पहारेकऱ्यांनी मुजरा केला. एकनाथ नुसता आश्चर्याने पहात होता. मग भानावर येत त्यानेही वंदन केले. दरबारात तसे अन्य कोणीच नव्हते.

आसनावर बसत त्यांनी एकनाथांना जवळ बोलावलं. म्हणाले, "तर एकनाथा, तू पैठणहून एकटा चालत चालत आलास, हे आता आम्हाला कळलं, पण पैठणचा-कोणाचा मुलगा तू?"

"मी सूर्यनारायणांचा मुलगा; पण आजोबांनीच माझं संगोपन केलं." एकनाथ स्वामीजींना म्हणाले.

"बरं, तुझ्या आजोबांचं नाव?" स्वामींनी विचारलं,

"चक्रपाणी शास्त्री म्हणतात सगळे त्यांना." एकनाथ म्हणाला, "अरे, म्हणजे आमच्या त्या चक्रपाणींचा तर तू नातू नाहीस?" आश्चर्यानं स्वामीजी म्हणाले.

"कोणते चक्रपाणी?" - एकनाथांनी विचारले,

"अरे, देवगिरीवर आणलेल्या पंढरपूरच्या पांडुरंगाच्या मूर्ती आपल्या तपश्चर्येच्या, साधनेच्या जोरावर पांडुरंगाला प्रसन्न करून ज्या भानुदासांनी परत पंढरपूरला नेल्या, त्यांचा विद्वान मुलगा म्हणजे आमचा चक्रपाणी." स्वामींनी एकनाथांना सांगितले.

"स्वामीजी तेच हे चक्रपाणी. मी त्यांचाच नातू." एकनाथ म्हणाले.

"म्हणजे मूळ नक्षत्रावर जन्म झाला आणि ज्याचे आई-वडील लगेचच स्वर्गवासी झाले, त्यामुळे ज्या नातवाची सर्व जबाबदारी चक्रपाणींवर येऊन पडली, ते अभागी बालक म्हणजे तूच तर !" स्वामी म्हणाले.

"होय स्वामी ! तो अभागी पोर म्हणजे मीच - एकनाथ."

Digitization by Arya Samaj Charitable Foundation Trust, Delhi.

एकनाथ म्हणाले.

"बरं. मग, आता इथं कशासाठी आलास?" स्वामी.

"आपल्या चरणांची सेवा करायला." एकनाथ.

"अरे वेड्या, माझी सेवा करून तुला काय मिळणार?" स्वामी.

"आपला अनुग्रह." एकनाथ.

"अनुग्रह?" स्वामी.

"होय. मी केलेली वेडीवाकडी सेवा आपण गोड मानून घेतलीत की मला अनुग्रह मिळाल्यासारखेच आहे." एकनाथ.

"पण तू आजोबांची परवानगी घेतलीस?" स्वामी.

"नाही. अलीकडे ते माझा राग राग करतात. चिडचिड करतात." - एकनाथ.

"अरे, तुझ्यावर त्यांचा भारी जीव. मग राग राग करण्याचं कारण तरी काय आहे?" स्वामी.

"मी खूप शंका विचारतो त्यांना. त्या त्यांना आवडत नाहीत. त्याचा राग येतो त्यांना. मग चिडचिड करतात."

"अशा राग येण्यासारख्या कोणत्या शंका विचारतोस त्यांना?" स्वामी. मग आजोबांना विचारलेल्या सर्व शंका धडाधडा त्यानं स्वामींसमोर बोलून दाखविल्या.

एकनाथ हा स्वतंत्र बुद्धीचा, विचार करणारा, तेजस्वी, दृढनिश्चयी असा मुलगा त्यांना वाटला. ते अतिशय आनंदी झाले. एकनाथांचा हट्ट पुरा करण्याचे त्यांनी ठरविले. म्हणाले, "एकनाथा, इथं माझ्याकडे तू राहू शकतोस."

ते ऐकताच एकनाथ हर्षभरीत झाले. त्यांनी परत एकदा स्वामींचे चरणी माथा टेकवून आशीर्वाद घेतला.

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

❀ गुरूची सेवा ❀

जनार्दन स्वामींनी एकनाथांस प्रेमाने उठवून आपल्या कुशीत घेऊन कुरवाळले आणि म्हणाले, "बाळा, ऊठ, आजपासून तू आमच्या कुटुंबातलाच एक झाला आहेस. तू समर्पित भावानं केलेली ईश्वराची उपासना, तू मनापासून केलेली निर्व्याज्य भक्ती, आनंदानं केलेली गुरुसेवा आणि न्रमतेनं केलेलं ज्ञानार्जन या गोष्टी तुला तुझं यश प्राप्त करून देतील.

"नाथा, तू तुझ्या घरी जसा आणि जितक्या मोकळेपणानं रहात होतास तसाच इथं रहा. काही फरक करण्याचं कारणच नाही. हेही घर आता तुझंच झालं आहे. काही लागत असल्यास नि:संकोचपणे ते मागून घ्यायचं. तुझ्या घरी तू जसा आजींना हाक मारायचास ना, तसंच किल्लेदारीणबाईंना आजी म्हणायचंस आणि मला तू काय म्हणून बोलावणार?"

"आपण सांगाल त्याप्रमाणे मी बोलावीन आपल्याला." एकनाथ.

"सगळे लोक मला स्वामी म्हणतात. तूसुद्धा त्याप्रमाणेच मला म्हणत जा."

गुरूंचं हे प्रेमाचं बोलणं ऐकून एकनाथांना फारच आनंद झाला. त्याने स्वामींच्या चरणी परत एकदा मस्तक टेकवले. स्वामीजींनी त्याला उठवून त्याची पाट थोपटली. आता एकनाथांच्या मनातला संकोच, थोडी भीती, बुजरेपणा पार नाहीसा झाला होता.

त्याच दिवसापासून एकनाथांनी गुरूंची सेवा करायला सुरुवात केली. स्वामींच्या बारीकसारीक गोष्टीचे बारकाईने निरीक्षण करू

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

लागले. त्यांना कधी काय लागतं, त्यांना कशाचा राग किंवा तिटकारा आहे, त्यांना काय आवडतं, ते कधी कधी काय काय करतात, हे त्यांनी चांगले पाहून ठेवले. मग स्वामींच्या प्रत्येक कामातच एकनाथ त्यांना मदत करीत असत.

एकनाथ स्वामींच्या आधी उठून मग वाडा झाडून स्वच्छ करीत असत. स्वतःची स्नान-संध्या, ध्यान-धारणा इ. नेहमीची कार्ये आटोपून घेत असत. मग स्वामींना अंघोळीसाठी पाणी काढून देणे, त्यांच्या नेसण्याच्या धोतराच्या निऱ्या करून ठेवणे, त्यांच्या संध्येची तयारी करणे, देवपूजेची तयारी करणे, देवाची भांडी स्वच्छ करून ठेवणे, निरांजन तयार करणे, कापराच्या वड्या काढून ठेवणे, समईत वाती घालून, तेल ओतून ठेवणे, मंजिरीसह तुळशीपत्र काढून आणणे, त्यांचे कपडे धुऊन ठेवणे, त्यांची सकाळची सर्व नैमित्तिक कामे आटोपल्यावर ते बाहेर जाण्यासाठी निघत, तेव्हा त्यांचे जोडे आणून समोर ठेवणे. इ. कामे मनापासून व न सांगता, न चुकता वेंळेवर करीत असत.

ते जेवायला बसले की त्यांना वाढायला मदत करीत असत. जेवणानंतर त्यांचे पाय चेपून देत असत. रात्री झोपताना त्यांचे अंथरूण घालून बिछाना व्यवस्थित लावत असे. ते झोपल्यावर त्यांचे पाय दाबत असत. त्यांना झोप लागल्यावर त्यांच्या पायाशी आपले अंथरूण टाकून ते झोपत असत. अशा तऱ्हेने आपल्या कामात त्यांनी कधी उणीव भासू दिली नाही.

अशा तऱ्हेने एकनाथ स्वामींच्या घरी आता चांगले रुळले होते. त्यांची भीड नाहीशी झाली होती. परकेपणा वाटत नव्हता. घरच्यासारखेच ते येथे अतिशय आनंदाने आणि मोकळेपणाने वागत

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

होते. जनार्दनस्वामी व त्यांच्या पत्नी या दोघांनाही मनापासून एकनाथ आवडू लागले होते. किंबहुना त्यांना एकनाथांचा लळाच लागला होता.



आपल्या गुरूंच्या आज्ञेप्रमाणे आणि मार्गदर्शनाप्रमाणे एकनाथ फावल्या वेळेत अभ्याससुद्धा करीत असत. वेद, गीता, भागवत, ब्रह्मसूत्रे, उपनिषदे इ. धार्मिक आध्यात्मिक ग्रंथांचें ते वाचन करून त्यावर स्वत: चिंतन करीत बसत. आता खरोखरीच स्वामींच्या घरातलाच ते एक होऊन गेले होते. स्वामी तर मुलांपेक्षाही ज़ास्त त्यांची काळज़ी घेऊ लागले होते. केवळ स्वामी आणि त्यांची पत्नीच नव्हे तर त्यांच्या ओळखीचे, येणारे-जाणारे या साऱ्यांनाच त्यांचे फार फार कौतुक वाटत असे.

Digitization by Arya Samaj Foundation Chennai

एकनाथांची तत्परता, हुशारी, कार्यक्षमता व बुद्धीची झेप पाहून स्वामी आता त्यांना कचेरीत आपल्याजवळ बसवून घेऊ लागले. स्वामींचा सारा वेळ फिर्यादी ऐकणे, निवाडे करणे, वसुली करणे, संरक्षणाचा बंदोबस्त करणे, या गोष्टींतच जात असे.

कचेरीतील प्रत्येक काम महत्त्वाचे, जबाबदारीचे व जोखमीचे होते. भांडणे, मारामाऱ्या, संपत्तीच्या वाटण्या यांसारखे खटले चालवून, त्यांचे म्हणणे ऐकून न्याय द्यावा लागत असे. जनतेच्या पोटापाण्याची, रक्षणाची व्यवस्था पहावी लागत असे. राज्यातील उत्पन्नाचा हिशोब लिहून ठेवावा लागत असे. स्वामींनी यांतील काही कामे आता एकनाथांवर पूर्णपणे सोपवून टाकली.

एकनाथांचे अक्षर फारच सुरेख होते; तसेच त्यांची भाषाही प्रौढ अशीच होती. म्हणून लोकांच्या आलेल्या अर्जांना उत्तरे देणे, ताकीद देणारे पत्र लिहिणे, अभय पत्र लिहिणे, ही पत्रे पाठविण्याची व्यवस्था करणे, ही कामे आता एकनाथ कौशल्याने करीत असत. पंत मजकूर सांगत आणि एकनाथ उतरून घेत असत.

नाथांनी आपल्या पुढच्या आयुष्यात लहानपणाच्या खेळाला जसा आध्यात्मिक रंग दिला, त्यांनी तसाच या कामालाही त्यांनी आध्यात्मिक रंग दिला. ते आपल्या जीवनाचे सर्वोच्च अधिकारी-सर्वेसर्वा-सरकार असलेल्या जनार्दनस्वामींना आपल्यावर सोपविलेल्या कामाचा अहवाल एका अर्जात सादर केला, तो असा-

'सरकार साहेबांची आज्ञा घेऊन स्वार झालो. परगणे मजकुरी येऊन सरकार व काम सुरू करावयास लागलो. तो परगणे मजकुराचे जमादार दंभाजी शेटे, कामाजी महाजन, मणिराम देशमुख, ममताई देशपांडीण, क्रोधाजी नायकवाडी, ऐसे हरामजादे बहुत आहेत. ते सरकार कामात कयास चालू देत नाहीत.'

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

हा अहवाल वाचल्यानंतर आपल्या लक्षात येते, की मानवी मनातील विकारांवर हे रूपक एकनाथांनी केले आहे. हा अर्ज नाथांच्या जीवाजी पंतांनी म्हणजे जीवाने केलेला आहे. देह हे नगर किंवा राज्य. या राज्यात जीवाजी पंत म्हणजे जीव हा ठाणेदार आहे. हा ठाणेदार आपल्या सरकारांना म्हणजे सद्गुरूरूपी जनार्दनांना आम्ही धर्मानं वागू, असे कळवतो आहे. तेव्हा सरकारना - सद्गुरूंना अतिशय आनंद होऊन ते जीवाजी पंतांना अभयपत्र देतात. ते पत्र असे -

जीवाजी पंतास अभयपत्र

कळावे की,

मौजे देहपुरीची वागणूक, उत्तम स्वधर्ममुक्त चालवू, ऐसे तुम्ही लिहून कळविले. तेणेकरून धन्यास संतोष जाहला.

ठाणेदार म्हणजे जीव व सरकार म्हणजे सद्गुरू यांच्या अत्यंत प्रेमाच्या, आपुलकीच्या नात्याने सरकार जीवाजी पंतांना महत्त्वाचे इशारे देतात, ते असे -

चिरंजीव जीवाजी पंत ठाणेदार,
यांसी आत्मरामपंत कमावीसदार,
कंसबे ब्रह्मपुरी
आशीर्वाद उपरी.
तुम्हास देहगांवचे ठाणे दिले आहे.
तर ठाण्यास सावधपणे वर्तणूक करणे
तेथे ममताई पाटलीण
तिने लटिकेचे दंभ उभे केले आहे
म्हणून तुम्हास सूचनापत्र लिहीत आहे.

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

❀ संतत्वाबरोबर पराक्रमही ❀

एकनाथ तरुण झाले होते. त्यांनी अध्यात्माबरोबरच तलवार-बाजीचेही शिक्षण घेतले होते, लेखणी आणि तलवार दोन्हीही ते उत्तम चालवीत असत.

गुरुवार सुटीचा दिवस. जनार्दनस्वामी या दिवशी काहीही काम करीत नसत. मग सारी जबाबदारी एकनाथांवर पडे. कारण स्वामी दिवसभर गुरुपादुकांसमोर समाधी लावून ध्यानस्थ बसत असत.

अशाच एका गुरुवारी किल्लेदार किल्ल्याकडे येत नाहीत, ही माहिती करून घेऊन किल्ल्यावर गुरुवारी शत्रूने अचानक आक्रमण केले. खबर द्यायला दूत धावत आले; पण स्वामी कुठयूत? त्यांनी नाथांकडे चौकशी केली.

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

"स्वामी ध्यानस्थ बसले आहेत. चला, मीच येतो." असं म्हणून नाथांनी स्वामींचंच चिलखत घातलं. हुबेहूब त्यांच्यासारखाच पोषाख घातला. कमरेला तलवार बांधून गुरूंचं मनोमन स्मरण करून घोड्यावर मांड ठोकली. टाच मारून घोडा भरधाव सोडला. स्वामींच्या सैन्यानं लांबून पाहिलं. त्यांना वाटलं, स्वामीच येत आहेत. सारे सैन्य मोठ्या उत्साहाने शत्रूवर तुटून पडले.

किल्लेदार येणार नाहीत, अशा समजुतीनं शत्रू थोडा गाफिलच राहिला होता. अचानक कडवा प्रतिकार पाहून शत्रू चक्रावून गेला. एकनाथ सैन्याला प्रोत्साहन देत, शत्रूला मागे रेटत नेत होते. शत्रूचे अनेक सैनिक मारले गेले; मग शत्रूने माघार घेतली. ते पळत सुटले. सापडतील तेवढे सैनिक पकडून नाथांनी कैदी बनविले. पराक्रम गाजवून विजयी होऊन एकनाथ माघारी पळाले. कैदी बरोबर आणले.

वाड्यावर येऊन पोषाख उतरवून, चिलखत काढून घोडा बागेत बांधला. स्नान केले आणि निवांतपणे ज्ञानेश्वरी, अमृतानुभव ग्रंथांचा अभ्यास करीत बसले.

संध्याकाळ झाली. स्वामींनी समाधी उतरवली. घराकडे परत निघाले. दिवसा घडलेल्या या घटनेची त्यांना माहिती नव्हती. त्यांनी पाहिलं, वाड्यासमोर हात बांधलेले, धरून कैदी केलेले शत्रूचे सैनिक, आपले सैनिक त्यांच्यावर लक्ष ठेऊन तावातावाने, उत्साहाने, आनंदाने बोलताहेत. पराक्रमाबद्दल एकमेकांची पाठ थोपटत आहेत. काय प्रकार आहे हे स्वामींना कळेनासा झाले.

त्यांनी एकनाथांना बोलावून चौकशी केली. एकनाथांनी येऊन नम्रपणे प्रथम गुरूंची क्षमा मागितली. म्हणाले, "गुरुदेव, क्षमा करा. कारण आपण ध्यानस्थ बसला असता शत्रूनं हल्ला केला. आपल्या परवानगीविना त्याचा प्रतिकार करण्यासाठी मी आपल्या सैन्यासह

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

शत्रूवर तुटून पडलो. शत्रूला पार पिटाळून लावले. त्यांचे सापडलेले हे सैनिक कैद करून आपल्यासमोर आणले आहेत.''

एकनाथांनी सांगितलेले ऐकून स्वामींना फार आश्चर्य वाटले व आनंदाने त्यांचा ऊर भरून आला. सहज म्हणून हा तलवारबाजी शिकतो काय आणि आज हा असा पराक्रम करून येतो काय! धन्य आहे या पोराची. त्यांनी नाथांना जवळ बोलावून त्यांची पाठ थोपटली. म्हणाले, ''एकोबा, धन्य आहे तुझी. फक्त तुझ्यामुळेच आज माझी लाज वाचली. आज तू माझ्यावरही ताण केली आहेस. शाब्बास ! अरे, शिष्य असावा तर असा. गुरूला सर्वांगानं त्यानं आत्मसात करावं. मी धन्य धन्य झालो आज. इथून पुढं या घराची सगळी जबाबदारी तूच सांभाळायची. मी घरात अजिबात लक्ष घालणार नाही.''

स्वामींनी बंदी सैनिकांकडे पाहिले. सारे कैदी घाबरले. त्यांना वाटलं, किल्लेदार आता आपल्याला नक्कीच देहान्त शासन देणार. त्यांचे सर्वांग थरथरू लागले. चेहऱ्यावर दिनवाणे भाव दिसू लागले. जनार्दन स्वामींच्या तोंडून आता काय हुकूम बाहेर पडतो, याची ते वाट पहात होते.

स्वामी म्हणाले, ''एकोबा, या बिचाऱ्यांची तोंडं बघ किती केविलवाणी झाली आहेत; ती तर मला बघवत नाहीतच, पण त्याहीपेक्षा त्यांच्या घरी... त्यांच्यासाठी टाहो फोडणाऱ्या त्यांच्या बायका, त्यांची मुलं... त्यांचा आक्रोश माझ्या कानात घुमू लागला आहे. यांची काय चूक ! सोडा त्यांना.''

मृत्यूच्या दाराकडं नजरा लावून बसलेल्या सैनिकांना तर स्वामींचा हा हुकूम ऐकून आश्चर्याचा धक्काच बसला. क्षणभर त्यांचा स्वत:च्या कानावरही विश्वास बसेना. स्वामींच्या सैनिकांनी त्यांना मोकळे केले.

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

त्यांनी किल्ल्याच्या दरवाज्याकडे धूम ठेकण्याऐवजी स्वामींकडे धाव घेतली. त्यांनी स्वामींच्या आणि एकनाथांच्या चरणावर डोके टेकले.

स्वामी त्यांना उठवीत म्हणाले, "बाबांनो, आता आनंदानं जा. या एकनाथांमुळं तुम्ही सुटलात. दुसरे कोणी तुम्हाला असे सोडणार नाही."

मुक्त झालेले सैनिक म्हणाले, "स्वामी, आम्ही आता शत्रू नाही, मित्र आहोत. केव्हांही सेवेसाठी हाक मारा. आम्ही हजर होऊ."

याप्रमाणे स्वामींच्या घरची सारी व्यवस्था एकनाथ पाहू लागले. देणे-घेणे, वसुली करणे, खरेदी करणे, दागदागिने सांभाळणे, हवे तेव्हा दागिने काढून देणे, धान्यधुन्य भरणे, घरातील वस्तू संपल्या आहे- नाहीत ते पाहून त्याप्रमाणे त्यांची आणण्याची व्यवस्था करणे. घरातील काम करणारांवर लक्ष ठेवणे, कामांची वाटणी करणे, सोपविलेली कामे त्यांनी व्यवस्थित केलीत की नाही ते पहाणे इ. इ. अनेक बारीकसारीक कामांकडेही नाथ लक्ष देऊ लागले.

❋ तो सेवक इथेच आहे ❋

देवगिरी किल्ला सुलतानाच्या राज्यातला. जनार्दन स्वामींची असामान्य योग्यता, व्यवहारचातुर्य, तीक्ष्ण व मेधावी बुद्धी, धर्मबुद्धी पाहून सुलतानाने त्यांना किल्लेदार केले. वीस खेडी त्यांच्या हुकमतीखाली दिली. सुलतानचा त्यांच्यावर पूर्ण विश्वास होता. अनेक कर्तबगार हिंदूंना मुस्लीम राजे प्रजेचे मन जिंकण्यासाठी, सहकार्य मिळविण्यासाठी अधिकारी म्हणून नेमत. चांगल्या कार्यासाठी त्यांचा जाहीर गौरव करीत असत.

Digitized by Arya Samaj Charitable Foundation Chennai

अशा कर्तबगार अधिकाऱ्यांपैकी जनार्दनस्वामी होते. ते न्यायबुद्धीने कारभार करीत. प्रजेचे हित पहात. त्यांच्या कल्याणाची काळजी घेत. प्रजेला त्रास होऊ नये याकडे लक्ष ठेवीत. राज्यकारभार म्हटले, की लहान-मोठ्या कटकटी कायम असणारच; पण अशा तापदायक, कटकटीच्या प्रसंगातही स्वामींची मन:शांती ढळत नसे. चेहऱ्यावरची प्रसन्नता कधी कमी होत नसे. निर्णयात कधी चूक होत नसे. आपल्या उपासनेतही कधी खंड पडत नसे.

स्वामींकडे किल्ल्याचा सर्व व्यवहार लिहिण्यासाठी एक सरकारकून होता. नांव होतं, भिकाजी पंत. ते वृद्ध होते. वृद्धत्वामुळं हिशोबात आपल्या हातून चूक वगैरे घडेल की काय, अशी त्यांना भीती वाटत होती. त्यांनी 'मला निवृत्त करा. माथी कलंक येण्याआधी मुक्त करा' असा स्वामींकडे सारखा लकडा लावला होता; पण स्वामी त्यांना सोडायला तयार नव्हते.

एक दिवस अचानक स्वामींनी भिकाजीपंतांना बोलावून घेतलं. भिकाजीपंत धावतच आले; कारण आज काही तरी आगळंच घडलं होतं. स्वामी असं सहसा अचानक बोलावीत नसत, म्हणून आल्या आल्या ते म्हणाले,

"स्वामी, आज असं अकस्मात बोलावणं केलंत?"

'होय. पण थोडं थांबा. एकनाथांना येऊ द्या, मग सांगतो."

स्वामींबरोबर सावलीसारखे वावरणारे एकनाथ तिथेच होते, ते म्हणाले, "हे काय, मी इथेच आहे की."

स्वामी म्हणाले, "भिकाजीपंत, तुम्हाला हवी असलेली, आनंद देणारी एक चांगली गोष्ट मी करणार आहे."

"मी समजलो नाही स्वामी. माझ्या आनंदाची कोणती गोष्ट आहे ती. कृपा करून मला सांगाल?" नम्रतेने भिकाजीपंत म्हणाले.

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

"तुम्हाला देवधर्म करण्यासाठी मोकळा वेळ हवा होता ना, तो देणार आहे मी तुम्हाला !" स्वामी म्हणाले.

भिकाजीपंत गडबडले. स्वामी पुढं म्हणाले, "तुम्ही म्हणत होतात ना, की माथी कलंक लागण्याआधी मला मोकळं करा. आज मी तुम्हाला निवृत्त करीत आहे. उपजीविकेसाठी पाच बिघे जमीन इनाम देण्याची सुलतानाकडे शिफारीस केली होती. आजच त्यास मान्यता आलेली आहे. एकनाथांकडून सनदा लिहून घ्या."

एकनाथ एकदम म्हणाले, "स्वामी, भिकाजीपंत किती एकनिष्ठ, किती कार्यक्षम. त्यांच्या तोडीचा माणूस मिळणं विरळा. असा दुसरा माणूस मिळेपर्यंत भिकाजीपंतांना ...."

त्याला थांबवीत स्वामी म्हणाले, "एकनाथा, अरे असा माणूस पाहिल्याशिवाय का आम्ही असा तडकाफडकी निर्णय घेऊ? हींच का आमची पारख केलीत?"

गोंधळून जाऊन एकनाथ म्हणाले, "क्षमा करा स्वामी ! मला तसं बोलायचं नव्हतं. पण मग त्या सेवकाला इथं बोलावून घ्यावं."

"तो सेवक इथच हजर आहे." स्वामी म्हणाले, हे बोलताना त्यांच्या चेहऱ्यावर प्रसन्नतेचं हास्य विलसलं होतं. पण हे ऐकून एकनाथ एकदम चमकले. हसत हसतच स्वामी पुढं म्हणाले, "एकनाथा, अरे, भिकाजीपंतांची जागा आता तूच सांभाळायची आहेस. आजपासून तू आमचा खजानवीस."

भिकाजीपंतांना सही-शिक्क्यानिशी सनदा देण्यात आल्या. मानाचे जरीकाठी उपरणे देण्यात आले. तरुण एकनाथांकडे आर्थिक व्यवहाराचे अधिकारपद सोपविण्यात आले.

जनतेत एकनाथाबद्दल प्रेम, आपुलकीची भावना निर्माण झाली होती. त्यांची गुरुभक्ती, त्यांची निष्ठा, त्यांची सेवावृत्ती, त्यांचा

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

अभ्यासूपणा, कर्तव्य-तत्परता, चाणाक्षपणा, निर्णयक्षमता, त्यांची सचोटी, कष्ट करण्याची प्रवृत्ती, कामात मन ओतून जीव टाकून काम यशस्वीपणे पूर्ण करण्याचा स्वभाव लोकांना आता माहितीचा झाला होता. स्वामींच्या अगदी जवळचा, विश्वासू म्हणून लोक त्यांच्याकडे आदराने पहात होते.

भिकाजीपंत निवृत्त झाले आणि त्यांच्या जागी एकनाथ खजानवीस झाल्याची बातमी जनतेला कळाली. साऱ्या लोकांना आनंद झाला.

भिकाजीपंतांची जागा आपल्याला मिळावी म्हणून कोणी चुगली केली नाही, कागाळी केली नाही. कारण एकनाथांच्या जवळपास इतक्या लायकीचाही कोणी माणूस जनतेत नाही, याची सर्वांनाच खात्री होती. त्यामुळेच साऱ्या प्रजेने शांतपणे, आनंदाने व मनापासून या घटनेचे स्वागत केले. एकनाथांकडून चांगलीच सेवा घडेल, याची सर्व प्रजेला खात्री होती.

❀❀❀

❀ लाखाची की दीडकीची, चूक ती चूकच ❀

एकनाथांनी नवीन जबाबदारी स्वीकारली; पण त्याचबरोबर गुरू जनार्दनस्वामींच्या मार्गदर्शनाखाली एकनाथांचे आध्यात्मिक अध्ययन, ग्रंथांचे वाचन, मनन, चिंतन, ध्यान-धारणा इ. गोष्टीही चालूच होत्या. पारमार्थिक साधना सतत चालूच होती. निरनिराळ्या शास्त्रांचेही शिक्षण चालू होते. पण हे त्यांच्यावर स्वामींनी सोपविलेल्या जबाबदाऱ्या सांभाळतच, त्या उत्तम तऱ्हेने पार पाडतच चाललेले होते. स्वामींना कोणत्याही कामात ढिलाई, गहाळपणा

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

चालत नसे. कशातही चूक, कुचराई खपत नसे. चाल-ढकल करण्याचा तर त्यांना तिटकारा होता. हिशोबांबाबतीत ते अत्यंत दक्ष आणि काटेकोर असत.

मग स्वामी एकनाथांना घेऊन बाहेर पडू लागले. कुळांच्या गाठीभेटी घालून देऊ लागले. कुळांच्या मदतीने एकनाथांचा कारभार सुरू झाला. आपल्या कारभारात एकनाथ सचोटी बाळगत असत. त्यामुळे प्रजेच्या मनात त्यांच्याबद्दल प्रेम व भक्तीची भावना सतत होती.

त्या काळी छोटे छोटे दुष्काळ पडत असत. अशा वेळी एकनाथ मोठमोठ्या धनिक, जमीनदारांकडून त्यांच्या कोठारातील धान्य उसने घेत असत व गोरगरीबांना मोफत वाटून टाकीत असत. पुढच्या वर्षी योग्य प्रकारे पाऊस पडला, चांगले पीक आले की उसन्या धान्याची वसुली करून ज्याचे त्याला धान्य परत केले जायचे.

अशा तऱ्हेने एकनाथांचा प्रामाणिकपणाचा, सचोटीचा, गरीबांच्या कनवाळूपणाचा कारभार चालू झाला. मग स्वामींना उपासनेसाठी जास्तीत जास्त वेळ मिळू लागला. स्वामी जेवताना एकनाथांना आपल्याबरोबरच बसवीत असत, अगदी वय झाल्यावर जनार्दन स्वामी एक वेळ दुपारीच जेवण घेत व सायंकाळी फक्त दूध-केळ्याचा फराळ करीत; पण या दोन्ही वेळी एकनाथ बरोबर असत.

संध्याकाळी गुरू फराळ करीत अशा वेळी प्रारंभी एकनाथांना भरपूर जेवायचा संकोच वाटे; पण पुढे स्वामींनी समजूत घातली, आग्रह केला तेव्हा ते नेहमीसारखे जेवू लागले. जेवता जेवता आपल्या कारभाराचा हिशोब एकनाथ स्वामींना देत असत.

एकदा पौर्णिमेची रात्र होती. टिपूर चांदणे पडले होते. जेवताना

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

एकनाथ अस्वस्थ आहेत, हें स्वामींनी जाणले होते. ते नाथांना म्हणाले, "एकोबा, चल घटकाभर थंडीतल्या रात्रीचे सौख्य चाखू या. थोड्या गप्पागोष्टी करीत फिरून येऊ या."

पण नाथ म्हणाले, "स्वामी ! थोडं म्हणजे खरंचं थोडं, अगदी घटकाभरातच परत येऊ या !"

खरंतर एकनाथ आज्ञाधारक होते. गुरू म्हणतील ते शिरसावंद्य मानत. कधी टाळायचं नाही. कधी आनाकानी करायची नाही. अट तर कधीच नाही. पण आज एकनाथांनी अट घातली. घटकाभरच असं का? स्वामींनी जास्त विचार केला नाही. एकनाथ करेल ते चांगलंच. जो निर्णय घेईल तो जनहिताचाच असणार, याबद्दल स्वामींना प्रचंड आत्मविश्वास होता. दोघे थोडा वेळ बाहेर गेले व गप्पाटप्पा, हास्यविनोद करीत थोड्याच वेळात परत आले.

इतके दिवस स्वामींच्या सहवासात राहूनही स्वामींची रसिकता कधी एकनाथांच्या ध्यानी आलीच नव्हती. स्वामी विद्वान होते हे खरे, पण त्यांच्या विद्वत्तेचा आवाका या प्रसंगातच आज एकनाथांना कळून आला होता.

स्वामींना झोप लागली. मध्यरात्र उलटून गेली. तांबडं फुटायला आलं. स्वामींच्या झोपेची थोडी चाळवाचाळव होत असतानाच एक हलकासा आवाज झाला. स्वामी ताडकन उठून बिछान्यावर बसले. पहातात तो पायाशी नेहमीप्रमाणे एकनाथ झोपलेला नाही. सहज शेजारच्या खोलीकडे नजर वळविली. तेथे दिवा जळत होता. स्वामी तेथे जाऊन उभे राहिले.

पहातात तो एकनाथ जागाच, कामात मग्न. चेहऱ्यावर पूर्तीचा आनंद. एकनाथांचं लक्षच नाही. मग स्वामीचं जवळ जाऊन म्हणाले, "एकोबा, अरे, अजून तू जागाच? आणि हे काय? कसले हिशोब

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

चाललेत? आणि ही काय वेळ आहे, हिशोब करत बसायची?''

एकनाथ म्हणाले, ''क्षमा करा स्वामी ! आपली झोपमोड करण्याचा माझा हेतू नव्हता. पण हिशोबात एका अधल्याची चूक होती. सगळ्या बेरजा परत परत तपासल्या. सगळ्या चोपड्यातले हिशोब तपासले; पण हिशोब लागत नव्हता. शेवटी आता चूक सापडली. आनंदाच्या भरात अनवधानाने टाळी वाजवली आणि आपली झोपमोड झाली.''

''तसं नव्हे एकोबा. पण अधल्याच्या चुकीसाठी एवढा त्रास कशासाठी घ्यायचा हेच मला कळाले नाही.'' स्वामी म्हणाले.

एकनाथ म्हणाले, ''स्वामी, प्रश्न अधल्याच्या चुकीचा नाही. चूक लाखाची कां दीडकीची हे महत्त्वाचे नाही; कारण चूक ती चूक. मी माझ्या अंतरात्म्याला साक्ष ठेवून प्रतिज्ञा केली आहे, की सद्गुरूंची सेवा प्राणपणाला लावून अगदी बिनचूकपणे करायची; त्यामुळे ही

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

चूक सापडेनाशी झाल्यावर मी फार बेचैन झालो होतो."

"आणि चूक सापडताच आनंदाने टाळी वाजविली. असंच ना ? आता जा आणि शांत झोप घे." स्वामी म्हणाले.

❀ मन दत्तभक्तीत गुंतव - गुरूंचा आदेश ❀

आपल्या मुलासारखीच नाथांची स्वामी काळजी घेत असत. आई-बापाविना पोर. लहान वयातच त्याला अध्यात्माची ओढ लागली. त्याच हेतूच्या पूर्तीसाठी कोणालाही न विचारता, कोणाची परवानगी न घेता विरक्तवृत्तीने माया-ममता, घरादाराचे पाश सहज तोडून आपल्याकडे आले. प्रत्येक गोष्टीचा ध्यास घेऊन, ध्यान देऊन, नीटनेटकेपणाने, निष्ठेने व काळजीपूर्वक अध्ययन आणि मनापासून गुरुसेवा केली. तारुण्यात प्रवेश करताना ऐहिक जीवनातील प्रत्येक गोष्टीत तरबेज झाला.

या गोष्टींबरोबरच या मुलानं भक्ती आणि ज्ञान या दोन्ही मार्गांनी आध्यात्मिक-पारमार्थिक जीवनाची प्रगतीसुद्धा अत्यंत वेगाने केली. एकनाथांच्या झालेल्या विकासाने स्वामी मनातून खूप आनंदून जात.

भागवत वगैरे वाचलेल्या धर्मग्रंथांतील विचार एकनाथ स्वत: आचरणात आणीत होते. ज्ञानेश्वरी व अमृतानुभव या ज्ञानेश्वरांच्या दोन ग्रंथांनी तर एकनाथांचं भावविश्व व्यापून टाकलं होतं. या ग्रंथार्तील ज्ञान, भक्ती आणि कर्म या तिन्ही निष्ठा त्यांच्या जीवनात पूर्णपणे उतरल्या होत्या. निर्गुण-निराकार अशा एकमेव परमात्म्याचे अस्तित्व ते आता साऱ्या विश्वातच अनुभवू लागले होते. द्वैत गळाले होते. समत्वाची निरहंकार दृष्टी त्यांच्याकडे आली होती.

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

अहंकार नाही, भेदाभेद नाही. सारे धर्म, पंथ, जाती त्यांच्या जिव्हाळ्याचे झाले होते. विटाळ-चांडाळ, सोवळे-ओवळे या सगळ्या पलीकडे त्यांचे विचार गेले होते. ते स्वत:च्या व इतरांच्याही जीवनात शुद्ध आचरणाला महत्त्व देऊ लागले होते. त्यांच्या जीवनाला सद्गुरूंच्या परतत्त्वाचा स्पर्श झाला होता. या स्पर्शासरशी होते-नव्हते ते सारे हिणकस जळाले होते.

जनार्दन स्वामींना नाथांमध्ये झालेला बदल, प्रगती कळत होती, दिसत होती. एकनाथांचे जीवन परमार्थिक झाले होते. या पारमार्थिकाच्या जीवनात परमात्म्याच्या सगुण, साकार भेटीचाच फक्त अवकाश होता, हेही स्वामी जाणून होते, आणि म्हणून तो योग येण्याच्या दृष्टीने ते आता पावले टाकीत होते.

म्हणूनच निष्ठेने, तळमळीने हिशोबातील चूक शोधून काढल्यावर ते एकनाथांना म्हणाले, "एकोबा, तुझं शुद्ध, निर्मळ, समर्पित जीवन आणि तुझं सच्चरित्र नक्कीच कौतुकास पात्र आहे. तुझं कौतुक करावं तेवढं थोडं. तू फार मोठा होत आहेस. तुझ्या सच्चरित्राचा आदर्श लोक पिढ्यान् पिढ्या ठेवतील; पण इतक्याच तळमळीनं आपलं मन दत्तभक्तीत गुंतवलंस तर तुझ्या जीवनाचं सोनं होईल."

❋ श्री दत्तात्रेय-दर्शनाचा मार्ग ❋

एक दिवस संध्याकाळी स्वामी एकनाथांना घेऊन गुरुपादुकांच्या त्या टेकडीवर गेले. तेथे गुरुपादुकांना वंदन केले व ध्यानस्थ बसले. एकनाथांनीसुद्धा गुरुपादुकांना वंदन केले. पहातात तर स्वामींचे ध्यान लागलेले. म्हणून ते बाजूला एका दगडावर बसले. बघता बघता लांबून

Digitized by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

एक राठ केस पिंजारलेला, जाड कापड अंगावर गुंडाळलेला माणूस आलेला त्यांनी पाहिला. त्याच्यामागून एक मरतुकडी कुत्री येत होती. तिच्यामागे तिची तीन पिल्लं येत होती.



एकनाथ मनात म्हणाले, असे वाटेल तसे लोक अंधारात फिरतात. लोक यांनाच घाबरून भूत समजतात. थोड्या वेळाने स्वामींनी ध्यान सोडले. दोघे परत घराकडे चालू लागले. एकनाथांनी मघाशी पाहिलेले दृश्य आणि त्यांच्या मनात आलेला विचार स्वामींना सांगितले. तसे स्वामी म्हणाले, "आपण थोडा वेळ आणखी तेथे थांबायला हवे होते. साक्षात दत्तात्रेय येत होते."

स्वामींचे ते बोलणे ऐकून 'भूत की देव' असे द्वंद्व एकनाथांच्या मनात सुरू झाले. मग त्यांनी मनाला समजावले. स्वामी वयानं ज्येष्ठ. त्यांच्या उपासनेतला अधिकार मोठा. तें सांगतात तेच खरं.

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

उत्तंगऋषींच्या समोर देव चांडाळाच्या रूपानं नव्हता का प्रगट्ला?

मन द्विधा असतानाच एकनाथ घरी आले. रात्री झोपले. पण रोज स्वामींच्या आधी उठणारे एकनाथ बराच वेळ झोपले. मग स्वामींनी प्रेमाने त्यांना उठविले. एकनाथांनी स्वामींची क्षमा मागितली आणि स्वप्न पाहिले असे सांगितले. स्वामी म्हणाले, "तुझी आन्हिकं आटोप; मग मी ऐकतो तुझं स्वप्न."

त्याप्रमाणे न्याहारी करताना एकनाथांनी सांगितले,"रात्री स्वप्नात काल पाहिलेला माणूस आला. त्यांच्या सोबत ती मरतुकडी कुत्री व तीन पिले होती. त्यांनी तुमच्या हाती कटोरा देऊन, कुत्रीचे दूध काढण्यास सांगितले. मग झोळीतील भाकरी कटोऱ्यात टाकून कालवण्यास सांगितली व तो प्रसाद तुम्हाला दिला; मग मला वाटी धुण्यास सांगितले. धुताना वाटीतील भाकरीचा तुकडा पाण्यावर तरंगत होता. भक्तिभावाने तो प्रसाद मी माझ्या तोंडात टाकला. तो तुकडा तोंडात टाकताच सर्वांगात नवचैतन्य संचारले. मनात नवीन उत्साह भरला, मी परत आलो तर तुम्ही दोघे गप्पा मारीत होता. मी पाहिले, तो माणूस नव्हता व ती कुत्री नव्हती; साक्षात दत्तात्रेय व कामधेनू समोर होते. मी जवळ येताच तुम्ही म्हणालात, हा एकोबा. माझी सावली. फार कष्टाळू, एकनिष्ठ व भाविक आहे. याच्या मनात गरीबांसाठी तळमळ आहे. तसं भगवान म्हणाले, असे आहे तर याच्या हातून जनकल्याणच होणार आहे. पण याचा सांभाळ तूच करायला हवा आहे."

एकनाथांचे स्वप्न ऐकून स्वामींना असे वाटू लागले, की याला आता जास्त काळ आपल्या सेवेत ठेवून घेता कामा नये. म्हणून एक दिवस दत्तगुरूंच्या पादुकांच्या दर्शनाला जात असताना ते म्हणाले,

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

"एकनाथा, तू तुझं स्वप्न सांगितलंस. मी विचार केला, तेव्हा मला वाटलं, हा एक प्रकारे मला इशाराच मिळाला आहे."

"कसला इशारा स्वामी?" एकनाथांनी विचारले.

स्वामी म्हणाले, "अरे तू चांगलं अध्ययन केलंस, माझी सेवा केलीस. तू मोठीच प्रगती साधलीस. तुझ्या जीवनात यापुढेही फार मोठं कार्य तुला करायचं आहे. ते माझ्या इथं राहून करता येणार नाही, म्हणून आता तुला माझ्याजवळ ठेवून घेणं म्हणजे तुझ्या आयुष्यातला महत्त्वाचा वेळ फुकट घालवणे आहे. तू आता तपश्चर्येला जावंस असं मला वाटतं."

शेजारी डोंगर आहेत. एखादी सुंदर टेकडी बघ. तेथे वटवृक्षाखाली बसून ध्यान-धारणा, तपश्चर्या कर. या साधनेमुळे तुझं आत्मसामर्थ्य वाढेल. मन:शांती मिळेल. अरे, समाजात पसरलेल्या दोषांना नियंत्रित करण्याचं काम साधूसंतांचं. पण माझ्यासारखे वय झालेले लोक हे काम करू शकणार नाहीत. तू तरुण आहेस, उमदा आहेस, उत्साही आहेस. जिद्दी आणि कष्टाळू आहेस. हे काम तुलाच करावं लागेल."

"माझं वय झालं आणि मी किल्लेदाराचं पद स्वीकारलेलं आहे. नोकरी म्हणजे बांधिलकी आलीच. कामं करावयाची आणि त्याच्या मर्यादाही अगदी ठरून गेल्यासारख्याच असतात. पण तुझं तसं नाही. तू मोकळा आहेस. तुझं आत्मसामर्थ्य वाढलं तर तू उंच गरुडभरारी घेऊन कुठेही जाऊ शकतोस. समाजात सर्वत्र भेदाभेद माजला आहे. जातिभेद आहे, धर्मभेद, उच्चनीच भेद, श्रेष्ठ-कनिष्ठ भेद, गरीब-श्रीमंत भेद, वर्णभेद, कार्यभेद. नुसती बजबजपुरी माजली आहे. पैशाच्या आणि सत्तेच्या पायी माणूस निष्ठुर होत आहे. माणूस माणसाला ओळखेनासा झाला आहे, गरीबांना कोणी वाली नाही.

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

दीनांना त्राता नाही. ते भरडले जात आहेत. त्यांना मदत करायला हवी. एकोबा, हे काम तुला करायचंय.'

''ठीक आहे स्वामी. अधिक वेळ न दवडता मी उद्याच प्रयाण करतो.''

एकनाथांनी स्वामींना आश्वासन दिलं.

''एकोबा, जा. पण काही विशेष घडलं, तर मला नक्की कळव हं. माझा आशीर्वाद आहे.'' स्वामी म्हणाले.

दुसऱ्या दिवशी भल्या पहाटे उठून, स्नान-संध्या आटोपून स्वामींच्या चरणांचे दर्शन घेऊन, स्वामींचा लाडका एकोबा तपश्चर्येसाठी बाहेर पडला. वायव्य दिशेने चांगला पंधरा-वीस किलोमीटर चालत गेल्यावर एक निसर्गरम्य अशी सुंदर टेकडी त्याला दिसली; एकनाथ टेकडीवर गेले. एका हिरव्यागार, सदाहरित, डेरेदार वृक्षाखाली तपश्चर्येला बसून सुरुवात केली.

❋ अजब दर्शन ❋

त्या टेकडीवरून दोन गावं जोडणारी पाऊलवाट जात होती. लोक तेथून जात-येत असत. कांही लोकांनी एकनाथांना तिथं तप करताना पाहिलं. तप करणाऱ्याची सेवा केली तर पुण्य मिळते, असा लोकांचा समज होता. एक गवळी रोज सकाळी दुधानं भरलेला तांब्या एकनाथांजवळ ठेवायचा. संध्याकाळी घरी परत जाताना मोकळा तांब्या घेऊन जायचा.

एके दिवशी सायंकाळी रोजच्याप्रमाणे रिकाम्या तांब्या

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

घेण्यासाठी एकनाथांकडे निघाला. लांबूनच त्याने जे दृष्य पाहिलं, त्यानं तो जागच्या जागी थबकला. भय आणि आश्चर्य यामुळं त्याच्या तोंडून शब्दही बाहेर पडेना. एकनाथ बसले होते. एका प्रचंड भुजंगाने त्यांना विळखा घालून त्यांच्या डोक्यावर फणा धरला होता. भुजंगाच्या डोक्यावर असलेल्या अत्यंत तेजस्वी खड्याचा प्रकाश एकनाथांच्या चेहऱ्यावर पसरला होता. त्यामुळं मूळचा तेजस्वी चेहरा जास्तच तेजस्वी दिसत होता.



क्षणभरात त्या गवळ्याने मोठ्याने आरडाओरडा केला. येणारे-जाणारे चारसहा जण धावत तेथे आले. त्यांनी ते दृष्य पाहून आरडाओरडा सुरू केला. लोकांचा आरडाओरडा ऐकून एकनाथांची समाधी भंग पावली. तसा त्या भुजंगाने आपला विळखा सोडला आणि सळसळ करीत क्षणार्धातच तो नाहीसा झाला. एकनाथ

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

भुजंगाला आपल्यापासून जाताना पहात होते; पण त्यांना त्याची भीती वाटत नव्हती. घाबरून दूर थांबलेली मंडळी भुजंग निघून गेल्याचे पाहून धावतच एकनाथांजवळ आली. सर्वांनी नाथांच्या चरणांवर डोके ठेवले.

एकनाथांना स्वामींचे शब्द आठवले. कांही विशेष घडले तर मला नक्की कळव, असे ते म्हणाले होते. एकनाथ उठले. देवगिरीच्या दिशेने चालू लागले. देवगिरीस पोहोचून स्वामींच्या घरी आले. स्वामी नित्याप्रमाणे गुरुपादुकांच्या दर्शनाला गेले होते; म्हणून एकनाथ घरीच थांबले.

स्वामी घरी आल्यावर टेकडीवर घडलेला तो अजब प्रकार त्यांनी स्वामींना सविस्तर सांगितला आणि म्हणाले, "स्वामी, काय समजायचं मी यामधून, ते कृपया सांगावे."

स्वामी म्हणाले, "अरे एकोबा, मला तर हा शुभ शकुनच वाटतो. तुला आता बाहेर पडायला हवं. यात्रा करायला हवी; पण थोडे दिवस इथंच. थांब फाल्गुन वद्य षष्ठी होऊ दे. मग मीच तुला आज्ञा करीन."

"जशी आज्ञा स्वामी !" असं म्हणून नाथांनी सद्गुरूंच्या चरणांना वंदन केले आणि स्वामींच्या घरीच राहू लागले.

❋ श्री दत्तात्रेय दर्शन ❋

एकनाथ आतापर्यंत सद्गुरूंमध्येच ईश्वर पहात होते. त्यामुळेच ईश्वराच्या भेटीची त्यांच्या मनाशी आशाच राहिलेली नव्हती. स्वामींना हे माहीत होते; पण तरीही सगुण-साकार अशा आपल्या

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

उपास्य दैवतांशी याची भेट घडवून द्यावी, असे त्यांना वाटले, किंवा दत्तात्रेयालाच आपले परमात्मरूप नाथांच्या आत्मरूपात पहायला सांगावे, असा त्यांनी विचार केला.

देवगिरीपासून जवळच छोटी निसर्गरम्य टेकडी होती. टेकडीवर सुंदर वनश्री होती. स्वच्छ पाणी असलेलं मोठसं तळं होतं. झाडंझुडपं, लतापुष्प यांनी या तळ्याची शोभा वाढविली होती. तिथं येणाऱ्याला देहभान हरपून लौकिकाचा विसर पाडायला लावणारं तिथलं वातावरण होते. तिथं जवळच एक औदुंबर वृक्ष होता. पूजनासाठी दत्तगुरूंच्या पादुका तेथे ठेवल्या होत्या. तेथे फाल्गुन वद्य षष्ठीला साक्षात दत्तात्रेय येऊन दर्शन देत असत; पण तरीही हे स्थान तसे उपेक्षितच राहिले होते. सहसा कोणी इकडे येतही नसे.

जनार्दन स्वामी मात्र कधी कधी एखाद्या गुरुवारी तेथे जात असत. तळ्याच्या पाण्याने स्नान करून, उपासना करीत. एक हजार पार्थिव शिवलिंगे बनवून त्यांचे यथासांग पूजन करीत. तेथे ते ध्यान करीत त्या वेळी सगुण साकार रूपात दत्तात्रेय त्यांना दर्शन देत. त्यांच्याशी बोलत असत. या वेळी फाल्गुन वद्य षष्ठीला एकनाथांसमवेत येथे येऊन नाथांना दत्तात्रेयांचे दर्शन घडविण्याचा त्यांचा विचार होता.

फाल्गुन वद्य षष्ठीला सकाळी लवकर उठून स्वामींनी स्नान-संध्या आटोपली. देवपूजा करून, नैवेद्य दाखवून, सर्वांना प्रसाद दिला आणि एकनाथांसह त्या टेकडीवर जायला निघाले. टेकडीवर जाऊन थोडा वेळ विश्रांती घेऊन औदुंबराच्या झाडाखाली आले. दत्तात्रेयपादुकांचे पूजन केले. नमस्कार केला. लगेच त्यांनी तेथे ध्यान धारण केले. नाथांनी त्यांच्याप्रमाणेच केले व डोळे मिटून नुसते बसून राहिले.

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

दुपार झाली. खणखणीत आवाजातील 'गुरुदेव दत्त' आरोळीने नाथांनी डोळे उघडले. मानेपर्यंत केस रूळलेला, दाढी असलेला, गुडघ्यापर्यंत लांब अंगरखा घातलेला व लुंगी लावलेला एक मुसलमान धर्मातील साधु-मलंग तेथे आला होता. त्याने त्या दोघांना निरखून पाहिले. तिथं थोडा वेळ थांबला. 'गुरुदेव दत्त' अशी घोषणा देऊ लागला.

नाथांनी त्याला पाहिलं, पण तो कोण आहे, हे त्यांना कळेना. इतक्यात स्वामींचे ध्यान संपले. त्यांनी डोळे उघडले तर समोर मलंग उभा. ते झटकन उठले. त्या मलंगाच्या पायावर डोके ठेवले. नाथांनी लगेच उठून त्या मलंगाचे दर्शन घेतले. मलंगाने दोघांना हात धरून उठवले. क्षणात तो साधू अदृष्य झाला. आता तेथे तीन शिरे सहा हाताचे साक्षात दत्तात्रेय उभे होते. अत्यंत शांत आणि तेजस्वी असे दत्तात्रेयांचे ते रूप दिसत होते. दोघांनी परत एकदा दत्तात्रेयांना वंदन केले. प्रत्यक्ष दत्तात्रेय भेटल्याने दोघांना समाधान वाटत होते.

स्वामी म्हणाले, "नाथा, प्रत्यक्ष दत्तभेटीचा आजचा दिवस मोठा भाग्याचा आहे, असे मी समजतो. आजवरच्या आपल्या उपासनेचं फळ मिळालं."

दत्तात्रेयांनी दोघांच्या डोक्यावर हात ठेवला. एकनाथांना आशीर्वाद देत ते स्वामींना म्हणाले, "हा मुलगा थोर, नशीबवान आहे. याचा सर्वत्र लौकिक पसरणार आहे. याच्या हातून धर्मरक्षणाचे काम होणार आहे." एवढे बोलून भगवान दत्तात्रेय अदृष्य झाले.

मग दोघेही घरी परत आले. स्वामींनी आपल्या पत्नीस घडलेला प्रसंग सांगितला. तिलाही फार आनंद झाला. नाथ स्वामींची पुढची आज्ञा होईपर्यंत तेथे राहिले. स्वामींच्या वाड्यात रोज कीर्तन-प्रवचन

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

होत असे. तेथे ऐकायला सर्वजण येत. एकत्र बसत. हरिजन येत, ब्राह्मण येत, श्रीमंत येत. गरीब येत, कांही मुसलमानही येत. सर्व एकत्रच बसत. भेदाभेद नव्हता. हरिदासांना भरपूर बिदागी मिळे. मानसन्मान मिळे. त्यांपैकी कोणीही या भेदाभेद न पाळण्याला आक्षेप घेतला नव्हता.

मग एक दिवस स्वामींनी एकनाथांना जवळ बोलावून घेतले आणि सांगितले, की 'तू आता प्रवासाला जा.'

एकनाथ म्हणाले, "गुरुदेव, प्रवास करून देवदर्शन करण्यापेक्षा आपल्या संगतीतच त्या निर्गुण निराकारतेचं दर्शन मला घडत असतं. आपले चरण सोडून कुठं जाणं माझ्या अगदी जीवावर येतं."

स्वामी म्हणाले, "एकनाथा, अरे असा विचार तू करू नकोस, पक्ष्याच्या पिलाला पंख फुटले म्हणजे त्यानंतर पक्षिणीच्या मोहात अडकून त्याला त्याच घरट्यात रहाता येईल का? नाही ना? त्याला ते घरटं सोडवंच लागतं. गुरुशिष्यांचंही तसंच असतं. गुरूनं शिष्याला आपल्या मोहात अडकवून ठेवू नये."

एकनाथांनी 'गुरुदेव, जशी आपली आज्ञा!' म्हणून स्वामींना वंदन केलं.

❋ स्वामी ... छेः, परमेश्वरच ! ❋

आपल्या सद्गुरूंमध्ये परमेश्वराचे दर्शन एकनाथ प्रथमपासूनच घेत होते. एकदा स्वामी सकाळंचा फेरफटका मारायला बाहेर पडले होते. एकनाथ वाड्यावरच होते. वाड्यावर सरकारकून आलेले होते. बोलता बोलता सरकारकुनांना एकनाथ म्हणाले –

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

"क्षमा करा देशपांडेजी."

ते ऐकून सरकारकून देशपांडे चमकलेच. गोंधळून जाऊन म्हणाले, "काय झालं हो एकनाथपंत?"

एकनाथ नम्रभावाने त्यांना म्हणाले, "अहो देशपांडेजी, माझ्यासारख्या लहान पोराला आपण पंत वगैरे काय म्हणता? अहो-जाहो काय संबोधता? मी आपणापेक्षा कितीतरी लहान आहे. आपण वडील आहात.'

"अहो पंत, पण हेच काही मोठेपणाचं लक्षण नसतं बरं. आपण धन्यांच्या खास मर्जीतले, म्हणजे आम्हाला आपले तुम्ही फारच मोठे, असं आमचं आपलं गणित ठरलेलंच आहे. आख्ख्या देवगिरीमध्ये आपल्याबरोबरीचा अन्य निष्ठावंत आढळणं शक्य नाही."

'बरं, बरं, पण मी काय म्हणत होतो, की स्वामींचा हा रोजचा फेरफटका असतो, तो कशासाठी असतो बरं?' एकनाथ म्हणाले.

आपल्या अमलाखालील असलेल्या प्रजेची, गोरगरिबांची, दीन-दु:खितांची, दुर्बल-अबलांची विचारपूस करण्यासाठी, अन्न वितरण करताना संबंधित अधिकाऱ्याकडून कोणावर अन्याय झाला असल्यास त्याची दखल घेऊन ती त्वरित दूर करता यावा यासाठी, कोणी आजारी असला, अपघातग्रस्त असला तर त्याच्या उपचाराची व्यवस्था करण्यासाठी, जनावरांच्या पेंड, सरकी, वैरणीची अडचण असल्यास ती सोडविण्यासाठी, सत्कर्मीना भेटून प्रोत्साहन देण्यांसाठी, ज्येष्ठ वंद्य व्यक्तींचे आशीर्वाद घेण्यासाठी.... पंत ...." देशपांडे बोलता बोलता किंचित थांबले.

तोच त्वरेने एकनाथ म्हणाले, "देशपांडेजी, बोलता बोलता थांबलात कां असे?"

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

देशपांडे म्हणाले, "पंत, पोथी-पुराणांमधून देवासंबंधीचे वर्णन आम्ही खूप वेळा वाचलं खरं, देवांच्या सुंदर सुंदर मूर्तीही आम्ही पाहिल्या आहेत. पण या समक्ष डोळ्यांना आतापर्यंत तरी सगुण साकार देव पहायला नाही मिळाला कधी."

"तो दिसतच नाही तर तुम्ही तरी कसे काय पहाणार?' एकनाथ म्हणाले.

"अहो पंत, हे काय आता आम्ही तुम्हाला सांगायला हवे? अहो, कधी कधी देव माणसांच्या रूपानं वावरतो, या जगात. जगातली माणसं त्याला देव माणूस म्हणतात? आपले जनार्दन स्वामी हे असेच एक देवमाणूस आहेत."

पंत हे जे बोलत होते ते एकनाथांना तंतोतंत पटत होते. नव्हे त्यांचा तो स्वानुभव होता; म्हणून या गुरूवर त्यांची भक्ती जडली होती. या भक्तीनेच त्यांनी ज्ञानाची प्राप्ती केली होती. या भक्तीनेच ते गुरूसोबत सावलीसारखे वावरत होते. या भक्तीनेच ते सेवा करीत होते.

❋ माझे कीर्तन माणसांसाठी ❋

इकडे स्वामींनी प्रवासात असलेल्या नाथांना दुताकडून निरोप पाठविला. 'पैठणमध्ये राहूनच जगाचा उद्धार करा.' गुरूंची आज्ञा टाळणं अशक्य म्हणून उत्तर दक्षिण भारतातील सर्व तीर्थ करता करता ते रामेश्वरकडे निघाले. काशीची गंगा रामेश्वरावर ओतली की महापुण्य लागते असे म्हणतात. जाताना वाटेत एका माळावर एक गाढव तहानेने व्याकुळ होऊन पडलेले त्यांनी पाहिले.

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

ईश्वर सर्व चराचरांत व्यापून राहिलेला आहे हे त्यांना आठवले. म्हणजे या गाढवात ईश्वर आहेच. त्याला तडफडत ठेवून कसे जायचे? त्यांनी आपल्याजवळचे गंगाजळ गाढवाला पाजले. गाढव उठून निघून गेले. एकनाथ पुढे गेले. राहिले थोडे गंगाजळ रामेश्वरावर वाहिले. त्यांना समाधान झाले.

यात्रा पूर्ण करून पैठणला आले. संन्यासी वृत्ती; मनाने मोहपाश तर कधीच तोडलेले म्हणून घरी गेले नाहीत. गावात मंदिराशेजारच्या पटांगणात पिंपळाच्या पारावर उभे राहून ते कीर्तन करीत. खड्या आवाजातील मधुर वाणीची रसाळ कीर्तने सर्वांना आवडू लागली. हरिजन, मुसलमानसुद्धा रस्त्यावर उभे राहून कीर्तन ऐकू लागले. चक्रपाणीही प्रथेनुसार तेथे जात असत. पण तेज:पुंज तरुणाला ते ओळखू शकले नाहीत.



Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

एक दिवस भावनेच्या भरात दोन हरिजन गर्दीत घुसले. तसे कर्मठ ब्राह्मणांनी भ्रष्टाचार भ्रष्टाचार म्हणून गोंधळ केला. एकनाथांनी आपल्या प्रभावी वाणीने शांतता निर्माण केली आणि सांगितले, 'माझे कीर्तन हे माणसांसाठी आहे. मग तो कुठल्याही जातीचा, धर्माचा, पंथाचा असो. ज्यांना हे मान्य नसेल त्यांनी माझ्या कीर्तनाला येऊ नये.'

चक्रपाणींनी हे ऐकले मात्र आणि लगेच म्हणाले, "हे, हेच ते माझ्या एकोबाचे विचार ! एकोबाशिवाय असे दुसरे कोणी म्हणूच शकत नाही." ते धावत पुढे गेले. 'माझा एकोबा' म्हणून त्याला कडकडून मिठी मारली.

एकनाथ रोज कीर्तन करीत. ज्ञानेश्वरी, अमृतानुभव, रामायण, महाभारत, भागवत इ. ग्रंथांचे निरूपणं करीत. कीर्तनाची महत्ता सांगताना ते म्हणतात, कीर्तनाने स्वधर्मपालन वाढते व आंतरबाह्य ईश्वर प्रगट होतो. मग या जगातील चराचरांत ईश्वराशिवाय काहीच दिसत नाही.

कीर्तने स्वधर्म वाढे । तेव्हा सबाह्याभ्यंतरी देव प्रकटे चराचरी ॥
दुजे देखावया संसारी । सर्वथा उरी ठरेना ॥

उत्तम फलप्राप्तीसाठी कीर्तनसुद्धा उत्तमच असावे.

यानंतर एकनाथांच्या तोंडून पद्याचा स्रोतच सुरू झाला.

त्यांनी अनेक अभंग, विराण्या, गवळणी, भारुडे, जोगवे लिहिले. त्यांनी हिंदीमध्येही पद्य रचना केल्या.

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

एकनाथ महाराज मराठीतून ग्रंथ रचना करायचे. हरिजन, दीन-दुबळे पतितांत मिसळायचे. कर्मकांडावर फटकारे ओढायचे; म्हणून अनेक भट, ब्राह्मण, शास्त्री, पंडित त्यांच्यावर जळफळत असत. त्यांच्या विरोधात कांहीबाही बोलत, चर्चा करीत असत. मग परधर्मीय... विशेषतः मुसलमान त्यांची हेटाळणी करायला टपले तर विशेष काय !

असेच एकदा एका यवनाने त्यांना त्रास द्यायचे ठरविले. गंगेवर अंघोळीला जाण्याच्या रस्त्यावर तो रहात होता. एकनाथ अंघोळ करून येत होते. तो यवन घराच्या चौथऱ्यावर उभा राहून पान खाऊन त्यांच्या अंगावर थुंकला. एकनाथ शांतपणे नदीवर गेले. अंघोळ करून आले. ते येत असताना तो यवन परत अंगावर थुंकला. ते न रागावता परत नदीवर जाऊन अंघोळ करून आले. असे १०८ वेळा त्याने केले.



Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

शेवटी एकनाथ रागावेनात, चिडेनात हे पाहून त्याला स्वत:शीच लाज वाटली. रस्त्यावर येऊन त्याने एकनाथांचे पाय धरले. माझे चुकले, क्षमा करा ! असे म्हणाला. त्याला उठवीत एकनाथ म्हणाले, "अरे, वेड्या, क्षमा काय मागतोस? किती चांगले काम तू केले आहेस. अरे, मी या गंगेच्या काठी राहूनही कधी तरी दिवसात एकशे आठ वेळा स्नान केलं असतं का? तुझ्यामुळे एकशे आठ वेळेच्या गंगास्नानाचं पुण्य मला मिळालं."

अशी एकनाथांची शांत, सहनशीलवृत्ती होती. त्यांचे शत्रूही यामुळंच त्यांना शरण येत असत.

एक दिवस असेच एकनाथ अंघोळ करून येत होते. वेळ दुपारची. ऊन मी म्हणत होते. वाळू तापल्याने पायाला चटके बसत होते. इतक्यात वाळूतून एक मूल मोठ्याने रडत चाललेले त्यांनी पाहिले. त्याच्या पायात काही नाही. त्याची आई किंवा नातलग कोणी जवळपास दिसेनात. नाथांनी त्याला उचलून कडेवर घेतले. इकडे तिकडे चौकशी केली. ते मूल हरिजन वाड्यातले होते. मुलाला घेऊन ते हरिजन वाड्यात गेले.

नाथांनी मुलाला घेतलेले पाहून हरिजन मंडळींना अचंबा वाटला. नाथांनी मुलाचे घर शोधून त्याच्या आईकडे त्याला दिले. नाथांचे पाय घराला लागले, म्हणून अंगण पावन झाले, असे म्हणून मुलाचे वडील म्हणाले, "अशी साधू माणसं आमच्या घरी अन्नाचे दोन घास खातील तर घर आणि आम्ही पावन होऊ. नाथ महाराज, आपण याल जेवायला ?"

"हो. अगदी आनंदाने." नाथ म्हणाले. दुसऱ्या दिवशीच येण्याचे ठरले. त्याप्रमाणे त्या हरिजनाने घर स्वच्छ केले. अंगण लखलखीत

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

केले. रांगोळ्यांनी सजवले. नाथ आले. आनंदाने जेवले. म्हणाले, "अशी स्वच्छता रोजच ठेवा आणि रात्री वाड्यावर येत जा, कीर्तनाला. कांही कळलं नाही तर विचारत जा."

"पण महाराज, मी ...." हरिजन चाचरला.

"मी हरिजन आहे, असंच ना? अरे, देवाने फक्त माणूसच निर्माण केला. हे भेद माणसाने पाडलेत; ते देवाला मान्य नाहीत. हे फरक मी स्वत:ही मानत नाही. आता तू स्वत: हे पाहिलंच आहेस. काम कोठलंही करा. फक्त आपला भाव शुद्ध असायला हवा. कोणत्याही माणसाने शुद्ध मनाने, सात्त्विक भावनेने देवाचे नामस्मरण केले, संकीर्तन केले, त्याची भक्ती केली, उपासना केली, की देव प्रसन्न होतो. त्यासाठी कर्मकांड करण्याची गरज नसते. देव फक्त भावाचा भुकेला असतो." त्या हरिजन पतीपत्नीने नाथांच्या चरणी मस्तक ठेवून वंदन केले. स्वत:ला धन्य धन्य मानले.

स्वत:चा उपदेश स्वत:च प्रथम आचरणात आणणारे असे एकनाथ महाराज महान होते.

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

आमची लोकप्रिय प्रकाशने









मे. सरस्वती बुक डिस्ट्रिब्युटर्स

६८१ ब, विनायक टॉवर, पहिला मजला, बुधवार पेठ, अप्पा बळवंत चौक, पुणे - २.

फोन : ५६२३१४९३ टेलीफॅक्स : २४४६७७९८